

आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ७० ■ अंक क्र.३८ ■ सोमवार ९ नोव्हेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

POST REGD.NO./DHL/53/24-26

उत्कृष्ट क्वालिटी
दिवाळी स्पेशल
काजु कतली ८००/- रू.किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेर पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

देशातील सशस्त्र नक्षलवाद आता संपला असून वैचारिक नक्षलवाद्यांशी मुकाबला: पंतप्रधान

बस्तर, दि. ८ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यंदाही दिवाळी देशाच्या रक्षणकर्त्यांसोबत साजरी करण्याची परंपरा कायम ठेवली. छत्तीसगडमधील बस्तर येथे सीआरपीएफच्या जवानांसोबत त्यांनी दिवाळी साजरी केली. यावेळी जवानांना संबोधित करताना त्यांनी नक्षलवाद विरोधातील लढाई, सुरक्षा दलांचे योगदान आणि देशातील अंतर्गत सुरक्षेच्या आव्हानांवर भाष्य केले. सशस्त्र नक्षलवाद्यांचा प्रभाव संपुष्टात आला असला, तरी वैचारिक नक्षलवाद्यांपासून सावध राहण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, देशातील प्रत्येक जिल्हा नक्षलवादमुक्त झाला आहे. अशा वातावरणात जवानांसोबत दिवाळी साजरी करण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. नक्षलवादाविरोधातील लढाईत सुरक्षा दलांनी दिलेले बलिदान, त्यांचे समर्पण आणि शौर्य यामुळे हे शक्य झाले आहे. जवानांच्या त्यागाचा सन्मान करण्यासाठी आपण त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करत असल्याचेही त्यांनी सांगितले. नक्षलवाद आणि फुटीरतावादाला आर्थिक मदत पुरवणाऱ्या यंत्रणांवर सरकारने कठोर निर्णयाद्वारे प्रहार केल्याचे पंतप्रधानांनी नमूद केले. बनावट नोटांचे जाळे उद्ध्वस्त झाल्याने नक्षलवादी आणि फुटीरतावादी संघटनांची आर्थिक पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याचा दावाही त्यांनी केला. गेल्या ४७ वर्षांत प्रथमच मागील एका वर्षात कर्तव्य बजावताना सीआरपीएफच्या एकाही जवानाला प्राण गमवावे लागले नसल्याचे त्यांनी सांगितले.

अनेक जिल्ह्यांत नक्षलवादाचा प्रभाव

नक्षलवाद विरोधातील लढाई अत्यंत कठीण होती, असे सांगताना मोदी म्हणाले की, एकेकाळी देशातील जवळपास २० राज्यांमधील २३० हून अधिक जिल्हे नक्षलवादाच्या प्रभावाखाली होते. संध्याकाळ झाली की जनजीवन ठप्प होत असे. **(पान ८ वर)**

एस आय आर प्रक्रियेतून चार न्यायाधीशांकडून पश्चिम बंगालमध्ये राजीनामे

कोलकता दि.८- बंगालमधील मतदार यादीच्या मविशेष सखोल पुनरीक्षणफ प्रक्रियेबाबत मोठी बातमी समोर येत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणूक आयोगाने स्थापन केलेल्या अपीलीय न्यायाधिकरणातून आतापर्यंत एकूण निवृत्त न्यायाधीशांनी राजीनामे दिले आहेत.

निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालमधील मतदार यादीतून नाव वगळण्यात आलेल्या सुमारे लाख मतदारांच्या अपीलांवर सुनावणी करण्यासाठी हे न्यायाधिकरण स्थापन केले होते. मात्र, नोव्हेंबर २०२६ मध्ये कलकत्ता उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश बिस्वजीत बसू यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे या न्यायाधिकरणाच्या कामकाजावर पुन्हा एकदा **(पान २ वर)**

शेतकरी कुटुंबासोबत मुख्यमंत्र्यांची दिवाळी लोहारी सावंगा येथे मुक्काम ; पिकांची पाहणी

नागपूर, दि. ८ (प्रतिनिधी) : दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंदाची दिवाळी थेट शेतकरी कुटुंबासोबत साजरी केली. नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यातील लोहारी-सावंगा येथे शेतकरी रामभाऊ बालपांडे यांच्या घरी मुक्काम करून मुख्यमंत्र्यांनी दिवाळीचा सण साजरा केला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत सरकार त्यांच्या पाठीशी असल्याचा विश्वास दिला. काल (दि. ७) सायंकाळी लोहारी सावंगा गावात भेट देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी बालपांडे यांच्या घरी भाकर, चपाती, बटाटे-वांग्याची भाजी, वांग्याचे भरीत, वालाच्या शेंगांची भाजी आणि वरण-भाताचा आस्वाद घेतला. भोजनानंतर ते ग्रामस्थांसोबत भजनातही सहभागी झाले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या गावात मुक्काम करून दिवाळी साजरी केल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण होते. आजपर्यंत मुख्यमंत्र्यांना प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली नव्हती. मात्र, फडणवीस यांनी थेट गावात येऊन मुक्काम केल्याने आनंदाचा सुखद धक्का बसल्याची भावना गावातील महिलांनी व्यक्त केली. दिवाळीच्या काळात मुख्यमंत्र्यांनी दिलेली ही भेट आपल्यासाठी भाऊबीजेच्या भेटीसारखी असल्याचेही महिलांनी सांगितले. **(पान ८ वर)**

लक्ष्मीपूजन निमित्त बाजारपेठेत गर्दी दर घसरल्याने झेंडू उत्पादक नाराज

धुळे, दि. ८ (प्रतिनिधी) : दिवाळीतील लक्ष्मीपूजनाचा उत्साह आज धुळे शहरात पाहायला मिळाला. लक्ष्मीपूजनासाठी आवश्यक असलेल्या विविध वस्तूंच्या खरेदीसाठी शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या आग्रारोड परिसरात नागरिकांची मोठी गर्दी उसळली होती. सकाळपासूनच बाजारपेठेत खरेदीसाठी लगबग सुरू होती. दिवाळी निमित्त पुजनासाठी आणि घर, व्यापारी प्रतिष्ठाने सजविण्यासाठी झेंडूची फुले चाळीस ते पन्नास रूपये किलोने खरेदी झाली. झेंडूचे दर घसरल्याने उत्पादकांनी नाराजी व्यक्त केली.



दिवाळीच्या चा उत्साहामुळे सर्वत्र चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. लक्ष्मीपूजनासाठी लागणारी झेंडूची फुले, हार, पूजेचे साहित्य, लक्ष्मीच्या मूर्ती, सजावटीच्या वस्तू तसेच विविध पूजासाहित्य खरेदी करण्यासाठी नागरिक बाजारपेठेत दाखल झाले. दुकाने आणि रस्त्यालगतच्या विक्रेत्यांकडे ग्राहकांची वर्दळ वाढली. सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत मोठी उलाढाल झाली. यंदा झेंडूच्या फुलांची आवक मोठ्या प्रमाणावर वाढल्याने फुलांच्या दरात लक्षणीय घसरण झाली आहे. **(पान ८ वर)**

गुलाबी थंडीची चाहूल पहाटे गारवा वाढला

मुंबई, दि. ८ : राज्यात हळूहळू हिवाळ्याची चाहूल लागण्यास सुरुवात झाली आहे. पहाटे आणि सकाळच्या वेळी हवेत गारवा जाणवू लागला आहे. दिवसा उन्हाचा चटका आणि उकाडा कायम असल्याने नागरिकांना दुहेरी हवामानाचा अनुभव येत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, सध्या राज्यातील कमाल आणि किमान तापमानात चढ-उतार सुरू असून, पुढील काही दिवसांत थंडीचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

राज्यातील अनेक भागांत कमाल तापमान ३४ ते ३७ अंश सेल्सिअसच्या दरम्यान नोंदवले जात आहे. कोकणातील रतकागिरी येथे राज्यातील **(पान ८ वर)**

नवापूर पाणी योजना ९३.१३ को.ची एमआयडीसीसाठी नाहीच : आ. रघुवंशी

नंदुरबार, दि. ८ (प्रतिनिधी) : नवापूर शहरासाठी मंजूर करण्यात आलेली ९३.१३ कोटी रुपयांची नवीन नळ पाणीपुरवठा योजना ही केवळ शहरासाठी आहे. या योजनेचा एमआयडीसीशी कोणताही संबंध नाही. नगरपालिका एमआयडीसीला पाणी पुरवठा करू शकत नाही. असे असतानाही विरोधकांकडून योजनेबाबत गैरसमज पसरवून विनाकारण राजकारण केले जात असल्याचा आरोप शिवसेनेचे नेते तथा आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी केला.



नवापूरयेथील रंगावली मध्यम प्रकल्पातून अमृत २.० योजनेंतर्गत ९३.१३ कोटी रुपये खर्चाच्या नवीन नळ पाणीपुरवठा योजनेचा कार्यादेश काढण्यात आला आहे. या योजनेला विरोध दर्शविण्यासाठी अलीकडेच मोर्चा काढण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर प्रतिक्रिया देताना आमदार रघुवंशी यांनी विरोधकांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले की, एमआयडीसीचे पाणी आरक्षण स्वतंत्र आहे. एमआयडीसी स्वतः पाणीपट्टी भरून पाण्याची उचल करते. नगरपालिकेच्या हक्काचे आरक्षित पाणी यापूर्वी नदीपात्रात सोडले जात होते. मात्र, नदीपात्र कोरडे असताना पाण्याचा प्रवाह आणि वहन यामुळे नवापूर शहरापर्यंत केवळ २५ टक्के पाणी पोहोचत होते. नवीन योजनेमुळे स्वतंत्र पाईपलाईनद्वारे आरक्षित पाणी थेट नवापूर शहरापर्यंत पोहोचणार आहे. शहराचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यास मदत होणार आहे.

योजनेवर होत असलेल्या आरोपांना उत्तर देताना रघुवंशी म्हणाले, आरोप करायला आणि विरोध करायला पैसे लागत नाहीत. नवापूर नगरपालिका एमआयडीसीला पाणी कसे देणार? रंगावली धरणात एमआयडीसीचे स्वतंत्र पाणी आरक्षण असल्याचे संबंधित **(पान ८ वर)**

प्रदूषणमुक्त दिवाळीसाठी विद्यार्थ्यांनी घेतली शपथ

धुळे, दि. ८ (प्रतिनिधी) : प्रदूषणमुक्त आणि आरोग्यदायी दिवाळी साजरी करण्याचा संदेश महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने दिला आहे. त्यासाठी धुळे तालुक्यातील निमगुळ येथील न्यू इंग्लिश स्कूल आणि जिल्हा परिषद शाळा क्रमांक दोन मध्ये विद्यार्थ्यांसाठी फटाके विरोधी जनजागृती अभियान राबविण्यात आले. फटाक्यांमुळे होणारे प्रदुषण आणि त्याचे परिणाम विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. त्यावेळी विद्यार्थ्यांनी प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करण्याची शपथ घेतली.

वसुबारसपासून सर्वत्र दिवाळी सणाला सुरूवात झाली आहे. दिवाळीच्या काळात मोठ्या प्रमाणात **(पान ८ वर)**

तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

धुळे, दि.८- येथील मिल परिसरातील तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. गणेश छोटु बोराडे (वय २९, रा. सुरतवाला बिल्डींगजवळ, सप्तश्रृंगी कॉलनी धुळे) असे त्याचे नाव आहे. शनिवारी मध्यरात्री गणेशने त्याच्या बेडरूममध्ये असलेल्या छताच्या पंख्याला साडीने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. वडील छोटु बोराडे यांच्यासह कार्हीनी खाली उतरवले. खासगी म्बुलन्सने श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले. डॉ. बागुल यांनी गणेश यास तपासुन मृत घोषित केले. याप्रकरणी धुळे शहर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली. घटनेमागचे नेमके कारण समजू शकले नाही. हवालदार अहिरे तपास करीत आहेत.

नुकसान झालेले मेंढपाळ कुटूंबला द फोक आख्यान ची भरीव मदत

कापडणे, दि. ८ : एकीकडे दिवाळी सण उत्सवात साजरा होत असतांना ग्रामीण भागात दुष्काळी परिस्थितीमुळे वाईट परिस्थिती निर्माण झाली आहे. याच वाईट परिस्थितीत गेल्या आठवढ्यात एका मेंढपाळाच्या तब्बल तीस मेंढ्या चोरीला गेल्याने मेंढपाळ कुटूंबाची तब्बल वीस वर्षांची कमाई हिरावली गेली. या सगळ्याच्या मोठा मानसिक धक्का या कुटूंबाला बसला.सोशल मीडियावर मेंढपाळ कुटूंबातील महिलांचा जीवाचा आकांताचा व्हिडिओ प्रसिद्ध झाल्यानंतर धुळे शहरात नुकत्याच पार पडलेल्या मद फोक आख्यानफ या टीमने आख्यानाच्या कार्यक्रमातील मिळालेल्या नफ्यातून मेंढपाळ कुटूंबाला किराणा साहित्य व रोख रक्कम देऊन दिवाळी गोड केली आहे. द फोक आख्यान या टीमने राबवलेल्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल सर्वस्तरातून कौतुक करण्यात येत आहे.



कापडणे शिवारातील एका शेतात चोरट्यांनी मध्यरात्री मेंढ्यांच्या कळपातून तब्बल तीस मेंढ्या चोरीला नेल्या. यामुळे रात्रंदिवस काबाडकष्ट करणाऱ्या मेंढपाळ कुटूंबाचे ऐन दुष्काळी परिस्थितीत लाखो रुपयांचे नुकसान झाले. **(पान ८ वर)**

दोन्ही शिवसेना एकत्र तरच दिवाळी : रघुवंशी

नंदुरबार, दि. ८ (प्रतिनिधी) : राज्याच्या राजकारणात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याच्या चर्चांना वेग आला असतानाच आता दोन्ही शिवसेना एकत्र येणार का, याबाबतही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी यासंदर्भात केलेल्या सूचक वक्तव्यामुळे नव्या राजकीय चर्चांना तोंड फुटले आहे.

श्री. उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दोघे एकत्र आले तर तीच खरी दिवाळी असेल, असे मत आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी व्यक्त केले. त्यांच्या या विधानामुळे दोन्ही शिवसेना पुन्हा एकत्र येण्याच्या शक्यतेबाबत चर्चांना **(पान ८ वर)**

तृतीयपंथीयांचा धुळ्यात दुध व्यवसाय म्हशींच्या पालनासह नव्वद लि. दुधाची विक्री

धुळे, दि. ८ (प्रतिनिधी) : समाजाकडून कायम उपेक्षा आणि भेदभावाचा सामना करावा लागणाऱ्या तृतीयपंथीयांनी आत्मनिर्भरतेची नवी वाट निर्माण केली आहे. पालकमंत्र्यांच्या प्रेरणेतून आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या संकल्पनेतून तृतीयपंथीयांचा २२ म्हशींचा दुग्धव्यवसाय प्रकल्प आर्थिक स्वावलंबनाचा आदर्श ठरत आहे. विशेष म्हणजे, स्वतःच्या कष्टातून रोजगार निर्माण करणाऱ्या तृतीयपंथीयांनी सामाजिक बांधिलकी जपत गरजूंच्या मदतीसाठीही पुढाकार घेतला आहे.



धुळ्यातील प्रेरणा बहुउद्देशीय संस्थेचा धुळ्यातील दुग्धव्यवसाय प्रकल्प सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या प्रेरणेतून आणि जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या संकल्पनेतून पशुसंवर्धन विभागाने जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून हा नावीन्यपूर्ण उपक्रम साकारला आहे. या प्रकल्पांतर्गत प्रेरणा संस्थेला २२ दुधाळ म्हशींचा गट उपलब्ध करून देण्यात आला आहे. मुऱ्हा आणि मेहसाना जातीच्या म्हशींचे संगोपन, चारा व्यवस्थापन, देखभाल आणि दूध विक्री **(पान ८ वर)**

राष्ट्रपती मुर्मू यांना पत्र सुरक्षेचा मुद्दा मांडल्याने सूडबुद्धीने कारवाई: सोनम

लेह, दि. ८ : लडाखमधील तरुणांचा आवाज उठविण्यासह लडाख आणि अरुणाचल प्रदेश यांसारख्या सीमावर्ती भागांच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केल्यामुळे प्रशासनाकडून सूडबुद्धीने कारवाई केली जात असल्याचा गंभीर आरोप प्रसिद्ध पर्यावरणवादी कार्यकर्ते आणि लेह अॅपेक्स बॉडीचे प्रमुख सदस्य सोनम वांगचुक यांनी केला आहे. आपल्या शैक्षणिक संस्थांनाही प्रशासनाकडून त्रास दिला जात असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

या प्रकरणी त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र लिहून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी वांगचूक यांनी केली आहे. गेल्या सहा वर्षांपासून लडाखमध्ये पोलिसांचे वर्चस्व वाढले आहे. स्थानिक नागरिकांचे लोकशाही अधिकार **(पान ८ वर)**

पासष्टाव्या महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेसाठी आमचा काळ मस्त होताचा सराव संपन्न

धुळे, दि. ८ (प्रतिनिधी) : मराठी रंगभूमीचा समृद्ध वारसा जतन करण्याच्या उद्देशाने पाच नोव्हेंबरला मराठी रंगभूमी दिन साजरा झाला. त्यानिमित्त धुळे शहरातील कलाहर्ष बहुउद्देशीय संस्थेतर्फे छत्रपती शाहू महाराज नाट्य मंदिरात विशेष कार्यक्रम झाला. त्यात ६५ व्या महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत सहभागी होणाऱ्या कलाकारांच्या उपस्थितीत नटराज पूजन करून नव्या नाटकाच्या सरावाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी अनेक कलावंत आणि नाट्यरसिक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात नटराज पुजनाने झाली. कलाकार आणि संस्था पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत राहुल बागुल यांच्या हस्ते नटराजाच्या मुर्तीला पुष्पहार अर्पण करण्यात आला. दीपप्रज्वलन करून मराठी रंगभूमीला अभिवादन करण्यात आले. नटराज पुजनानंतर दिग्दर्शक हर्षल परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी नाटकाच्या अधिकृत सरावाला सुरुवात करण्यात आली. मुंबई येथील प्रसिद्ध लेखक कय्युम काझी लिखित आमचा काळ मस्त होता, हे दोन अंकी नाटक कलाहर्ष संस्थेच्यावतीने सादर करण्यात येणार आहे. नाशिक येथे होणाऱ्या ६५ व्या **(पान ८ वर)**

नेवाडे शिवारातून केबल लांबवली

धुळे, दि.८- नेवाडे (ता. शिंदखेडा) शिवारातील शेतातून चोरट्यांनी तब्बल ९९० मीटर केबल लंपास केली. सुमारे तीन लाख रुपये केबलची किंमत असून शिंदखेडा पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल झाला.

शेतकरी मिलिंद जहागिरदार पाटील (वय ४२) यांचे गाव शिवारात शेत आहे. शनिवारी पहाटे पूर्वी दोन ते तीनच्या सुमारास चोरटे शेतात आले. शेतातील वीज पंपाची ९९० मीटर केबल वायर चोरुन नेली. २ लाख ९७ हजार रुपये केबलची किंमत आहे. याप्रकरणी मिलिंद पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार शिंदखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

कंत्राटी कर्मचाऱ्यांना समायोजनात समाविष्ट करा आशा गटप्रवर्तक संघटनेचे ना.रावलांना साकडे

धुळे, दि.८- राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत गट प्रवर्तक पदावरील कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन निर्णय दिनांक ३०-६-२६ नुसार समायोजनात समाविष्ट करून घेण्यात यावे. अशी मागणी महाराष्ट्र राज्य आरोग्य खात्यात आशा गटवर्तक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पालकमंत्री ना.जयकुमार रावल यांच्याकडे निवेदनद्वारे केली आहे.



निवेदनात नमुद केले आहे की, गट प्रवर्तक राष्ट्रीय आरोग्य अभियानात महाराष्ट्र अंतर्गत सन २००९ ते १० पासून जिल्हा आरोग्य विभागात कंत्राटी तत्त्वावर कार्यरत आहोत, नियुक्तीच्या वेळी आम्हाला विभागाकडून कंत्राटीनियुक्ती आदेश देण्यात आले असून,त्यासोबत शंभर रुपयांच्या बॉण्ड घेण्यात आलेला आहे, सन २०१७ पासून कोणतीही पूर्व सूचना न देता आमच्या सेवेचे स्वरूप कंत्राटी वरून मानधन तत्त्वावर करण्यात आले संदर्भ क्रमांक तीन अन्वये दिनांक ३०- ६- २०२६ च्या शासन निर्णयानुसार **(पान २ वर)**

शेतातून सातशे फूट केबल लंपास

धुळे, दि.८- शेवाडे (ता. शिंदखेडा) येथील विनोद शिवराम धनगर (वय ३०) यांचे गाव शिवारात शेत आहे. शनिवारी सकाळी शेतातील केबल आणि वायर चोरीस गेल्याचे आढळले.

शुक्रवारी दुपारी चार नंतर शेतातून मालक घरी आले. त्यानंतर चोरट्यांनी विहिरीतील वीज पंपाची चारशे फुट केबल, जलपरी सोलर पंपाची तीनशे मीटर केबल काढून नेली. २१ हजार रुपये वायरची किंमत आहे. याप्रकरणी शिंदखेडा पोलीस ठाण्यात शनिवारी रात्री उशिरा चोरीचा गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक मयूर भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार पटेल तपास करीत आहेत.

सूचना

आजच्या अंकासोबत दैनिक आपला महाराष्ट्रची दिपावली विशेष चार पानांची पुरवणी देत आहोत, याची वाचक, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

–संपादक

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,31,300 रु.+3% GST
सोने- 24 K -1,42,700 रु.+3% GST
चांदी- 1,91,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

शेतकऱ्यांच्या गोठ्याला दिलासा देण्यासाठी नियोजन जि.अधी. कृषी अधिकारी सूरज जगतापांची माहिती

धुळे, दि. ८- शेतात पिकलेलं सोनं असो की गोठ्यातील पशुधन बळीराजासाठी दोन्हीही तितकंच मोलाचं! दुष्काळात स्वत:च्या गरजांपेक्षाही मुक्या जनावरांच्या चाऱ्याची काळजी करणाऱ्या धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नवा आधार मिळणार आहे. कमी पाण्यात अधिक चारा उत्पादन, बहुकापणी पिकांना प्रोत्साहन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता वाढविण्याचे नियोजन शासनाने केले आहे. यासाठी कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या समन्वयातून विशेष उपाययोजना राबविण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सूरज जगताप यांनी दिली.

धुळे, साक्री, शिंदखेडा आणि शिरपूर तालुक्यांतील दुष्काळी परिस्थितीत पशुधनाच्या चाऱ्याचे नियोजन महत्त्वाचे ठरले आहे. पावसाचे असमान वितरण, खरीप उत्पादनातील घट आणि रब्बी हंगामातील संभाव्य कमी पेरणी लक्षात घेऊन शासनाने चारा उत्पादनवाढीसाठी पुढाकार घेतला आहे. यासाठी स्थापन केलेल्या अभ्यासगटाच्या २७ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या अहवालातील शिफारशींनुसार कृषी विभागाने २ नोव्हेंबर २०२६ रोजी मार्गदर्शक सूचना जारी केल्या असल्याचे श्री. जगताप यांनी सांगितले. कमी पाण्यात अधिक चारा; शेतकऱ्यांना नवा पर्याय दुष्काळात पाण्याचा प्रत्येक थेंब जपणाऱ्या शेतकऱ्यांना कमी पाण्यात अधिक चारा उत्पादन घेता यावे, यासाठी स्थानिक परिस्थितीनुसार योग्य पिकांची निवड करण्यावर भर देण्यात आला आहे. अल्प कालावधीत उत्पादन देणारी आणि एकापेक्षा अधिक वेळा कापणी करता येणारी चारा पिके घेण्यास प्रोत्साहन दिले जाणार आहे. मका, ज्वारी, बाजरी, न्यूट्रिफीड, शुगरग्रेझ आणि इतर योग्य चारा पिकांच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांनामार्गदर्शन करण्यात येणार आहे. जमिनीचा प्रकार, हवामान, उपलब्ध सिंचन आणि पीक कालावधी लक्षात घेऊन पिकांची शिफारस केली जाणार आहे. सिंचन सुविधा असलेल्या क्षेत्रांत रब्बी हंगामात चारा लागवड वाढविण्याला प्राधान्य राहणार असल्याचे श्री. जगताप यांनी स्पष्ट केले.

बियाण्यांची चिंता कमी करण्यासाठी आगाऊ तयारी

योग्य वेळी बियाणे मिळाले, तर शेतकऱ्यांना चारा उत्पादनाचे नियोजन करणे सुलभ होते. त्यामुळे रब्बी हंगामात चारा बियाण्यांची **(पान २ वर)**

राज्य शासनाचा मोठा निर्णय

डिजिटल पीक पाहणी ॲपमधील तांत्रिक अडचणीं शेतकऱ्यांना ऑफलाईन पीक नोंदणीची परवानगी

मुंबई, दि.७- केंद्राच्या मोबाईल प्लिकेशनमधील तांत्रिक त्रुटींमुळे त्रस्त असलेल्या राज्यातील सुमारे ७०,०००,००० शेतकऱ्यांना राज्य सरकारने आज एक अत्यंत दिलासादायक निर्णय घेऊन मोठा दिलासा दिला आहे। चालू खरीप हंगामातील पिकांची नोंदणी ऑनलाइन होऊ न शकल्यास, आता शेतकऱ्यांना प्रणाली अंतर्गत तलाठी पातळीवर ऑफलाईन पद्धतीने पीक पाहणी आणि नोंदणी करण्याची परवानगी शासनाने दिली आहे।

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार राज्य महसूल विभागाने यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय जारी केला आहे. ॲपमधील या तांत्रिक अडचणींमुळे घेतला निर्णय

१ डिसेंबर २०२४ पासून केंद्र सरकारच्या प्लॅटफॉर्मशी पीक पाहणी जोडण्यासाठी ॲपमध्ये काही तांत्रिक बदल करण्यात आले होते. मात्र, चालू खरीप हंगामात शेतकऱ्यांना यादरम्यान पुढील ४ प्रमुख मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. शेतकरी प्रत्यक्ष शेतात हजर असतानाही, पमध्ये शेत आणि प्रत्यक्ष सीमेमध्ये २० मीटरपेक्षा जास्त अंतर दाखवणे. ॲप्लिकेशनमध्ये गावाची नकाशे परस्परांमध्ये बदलणे. संपूर्ण गावांचे नकाशे ॲपमधून गायब असणे. अनेक शेतकऱ्यांची नावे किंवा त्यांचे खाते क्रमांक प्रणालीत न दिसणे. या तांत्रिक बिघाडामुळे शेतकरी पीक नोंदणीपासून वंचित राहू नयेत, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने हा ऑफलाईन नोंदणीचा पर्याय उपलब्ध **(पान २ वर)**

आपला महाराष्ट्र

बळी राज्याची संकल्पना आणि आजचे संदर्भ

आपण भक्त प्रल्हादाची कथा लहानपणापासून ऐकत आलेलो आहोत. त्याच्या निस्सीम भक्तीमुळे विष्णूने खांबातून नृसिंह अवतार घेतला. ना माणूस, ना प्राणी, ना दिवसा ना रात्री, शस्त्राचा वापर न करता हिरण्यकश्यपूचा वध केला. त्या प्रल्हादाचा बळी हा नातू होय. तो असुरी वंशात जन्मला होता. मात्र तो खूप पराक्रमी होता, न्यायप्रिय होता आणि दानशूर पण होता. विरोचन हे त्याचे वडील. त्याने आपल्या पराक्रमाने तिन्ही लोकी अधिकार प्रस्थापित केला होता. त्याचा वध करण्यासाठी विष्णू ने वामन अवतार घेतला. तो बळीराजांनी आयोजित केलेले यज्ञात सहभागी झाला. परंतु बळीराजाचे जे गुरु होते शुक्राचार्य त्यांनी या वामनाला ओळखले आणि बळीराजाला दान देण्यास मनाई केली. मात्र बळीराजांनी शब्द दिल्यामुळे दान देण्याचे मान्य केले. त्यानुसार वामनाने तीन पावले दान मागून एक पाऊल पृथ्वीवर दुसरे पाऊल स्वर्गात तर तिसरे पाऊस ठेवताना ते कुठे ठेवू असे विचारले तेव्हा बळीराजांनी स्वतःचे मुंडके पुढे केले त्यावर पाय ठेवून वामनाने बळीराजाला पाताळात पाठवले. बळीराजाचा हा त्याग किंवा दानाच्या वचनांचा परिणाम म्हणून बलिप्रतिपदा या दिवशी त्याचे स्मरण केले जाते. शेती संस्कृतीचा तो पुजारी होता. समतेचा दृष्टिकोन त्याच्याकडे होता. शेती संस्कृतीचा आद्य जनक म्हणून बळीराजाची ओळख आहे. त्याच्या राज्यात शेतीचे उत्पन्न भरघोस असायचे. त्यामुळे प्रजा सुखी होती. म्हणूनच आजही शेतकरी हा बळीराजाचे प्रतीक मानला जातो. म्हणूनच आजही इडा पिडा टळो, बळीचे राज्य येवो असे आपण म्हणत असतो. ती म्हण त्यामुळेच प्रचलित आहे.महात्मा फुले यांनी त्यांच्या सार्वजनिक सत्य धर्मात बळीचा उल्लेख केलेला आढळतो.

जोतिबा फुले यांच्या विचारविश्वात बळीराजा हा शेतकरी आणि कष्टकरी रयतेच्या न्याय्य राज्यव्यवस्थेचे प्रतीक म्हणून समोर येतो. त्यांच्या लेखनातून प्रस्थापित सामाजिक वर्चस्वाला पर्यायी अशी समता, श्रमप्रतिष्ठा आणि बहुजनांच्या कल्याणाची व्यवस्था अभिप्रेत असल्याचे दिसते. त्यामुळे बळीराजाची संकल्पना ही केवळ एका राजाच्या स्मरणापुरती मर्यादित राहत नाही; ती सामाजिक न्यायाच्या आकांक्षेचे प्रतीक बनते. महाराष्ट्रातील शेतकरी आणि बहुजन समाज इडा पिडा टळो, बळीचे राज्य येवो असा जो उदघोष करतो त्या उदघोषात केवळ जुन्या राजवटीच्या पुनरागमनाची इच्छा नाही, तर शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी माणसाच्या जीवनात सुख, समृद्धी आणि न्याय प्रस्थापित व्हावा, ही अपेक्षा दडलेली आहे. बळीराजा हा त्या अपेक्षेचा सांस्कृतिक आणि सामाजिक प्रतिनिधी बनला आहे.बळी राजा हा शेतकऱ्यांचा किंवा रयतेचा राजा मानला जातो. परंतु त्याला कपटाने हरवून त्याचे राज्य खालसा करण्यात आले होते. असे उल्लेख सापडतात. त्याचा अर्थ असा आहे की जी सनातन संस्कृती होती ती विशिष्ट समूहाची आणि त्या साम्राज्याचे समर्थन करणारी होती. त्या काळात शेती संस्कृतीशी निगडित असलेला घटक जेवढा उपेक्षित होता तेवढाच तो आजही आहे म्हणूनच बळीचे राज्य येवो असे म्हटले जाते. परंतु मुद्दा असा आहे की, आता आपल्या देशात संवैधानिक किंवा घटनात्मक लोकशाही नांदते आहे. त्या व्यवस्थेला आता ७५ वर्षांहून अधिक काळ लोटला. राजेशाही संपली. लोकशाही आली. मात्र तरीही आपण राजा शिवछत्रपतींचे नाव घेत असतो. त्यांची कार्यपद्धती आपल्याला आजच्या व्यवस्थेत अभिप्रेत असते. छत्रपती राजे जरूर होते परंतु ते लोकशाहीवादी ,रयतवादी राजे होते. त्याचप्रमाणे बळीराजा हा समन्यायवादी किंवा समाजवादी होता असे मानले जाते. ज्या ज्या डाव्या आणि पुरोगामी संघटना बळी महोत्सव साजरा करतात त्यांच्या दृष्टीने बळीराजा हा मोठा समतावादी राजा होता. आजच्या लोकशाही व्यवस्थेत किंवा संवैधानिक चौकटीत राजेशाही कितीही आदर्श असली तरी बसू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून आज राजकीय पक्षांच्या माध्यमातून प्रस्थापित झालेले लोकशाही सरकार महत्त्वाचे मानले जाते. त्या सरकारने भलेही बळी सरकार व्हावे. आणि संपत्तीचे श्रमाचे सम वाटप करावे अशी अपेक्षा आहे.

आज शेतकरी आणि शेती पूरक उद्योगावर आधारित असलेले कारागीर आणि शेतमजूर सुखी नाहीत. पूर्वापार चालत आलेली शेती आता आधुनिक पद्धतीने केली जाते. माणूस आता शेतात राबत नाही. मशीन राबते. शेतीचे व्यापारीकरण आणि यांत्रिकीकरण झाल्याने काही लोकांच्या हातातच ती आहे. आता तर मोठमोठ्या कंपन्या या व्यवसायात उतरलेल्या असून मोठ्या प्रमाणावर त्यांनी शेती खरेदी केली आहे. किंवा भाड्याने घेतली आहे. शेतकऱ्यांना त्या पोटी रग्गड पैसा मिळतो. त्यामुळे त्यांना आता शेतात जाण्याची आवश्यकता नाही. त्याचप्रमाणे शेतमजुरांनाही शेतात जाण्याची गरज नाही. शेतमजुरांची कामे मशीन करते. परिणामी बैल आणि माणसांच्या श्रमाच्या भरवशावर असलेली शेती मशीन मुळे विपुल प्रमाणात उत्पादन देते. परिणामी ती मनी ओरिएंटेड ग्रीकल्चर झाली आहे. शेतमालक स्वतः हून शेतीतून परागंदा झालेला दिसतो. त्यांची मुले कंपन्यांमध्ये नोकऱ्या करतात. ते कधीच बांधावर जात नाहीत. त्याचवेळी जे शेतकरी स्वतः शेती करतात किंवा त्यांची उपजीविका आजही शेतीवर अवलंबून आहे त्यांना यांत्रिक शेती परवडणार नाही शिवाय बाजार त्यांच्या हातात नसल्यामुळे भावाची हमी नाही म्हणून तो वर्ग कायम संकटातच सापडलेला असतो. त्यामुळे बळीचे राज्य होऊ शकत नाही. सरकार ती भूमिका घेत नाही, या पार्श्वभूमीवर इडा पिडा टळो, बळीचे राज्य येवो असे म्हटले तरी ती व्यवस्था प्रस्थापित होत नाही. परिणामी शेतकरी आणि शेतमजूर तसेच पूरक उद्योगांवर जगणारा वर्ग यांचे दैन्य संपत नाही.म्हणून बळी राज्याची संकल्पना प्रस्थापित होत नाही अशी मनात खंत आहे.

बळी महोत्सव साजरा करताना प्रस्थापितांनी उपेक्षितांवर जे इतिहास काळात अन्याय केले तसे आता सहन केले जाणार नाहीत असाही संदेश या महोत्सवातून देण्याचा प्रयतक झाला आहे .बळी हा असुरी वंशाचा होता आणि त्याचा देवादिकांना त्रास होत होता म्हणून देवतांनी विष्णु कडे मदत मागितली आणि वामन पुढे आला.त्याने कपटानेच बळीला पाताळात पाठविले.ही कथा आणि त्या भोवती गुंफलेले सनातनी विचारसरणीचे उदात्तीकरण आताच्या काळात गैरलागू वाटते म्हणूनच बहुजन समाज ती व्यवस्था नाकारून समन्यायी बळीच्या राज्याची व्यवस्था लोकशाहीत राजेशाही गैर लागू असूनही यावी असे म्हणतो याचा अर्थ समता अद्यापि खूप दूर आहे.ती यावी यासाठी केवळ सरकारनेच नव्हे तर समाजातील सर्व घटकांना एकत्र यावे लागेल.संविधानाच्या चौकटीत समतेचा मार्ग प्रशस्त करावा लागेल.भौतिक सोयी सुविधा वाढवाव्या लागतील.कृषीअर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी उत्पादन खर्चावर आधारित भाव शेतमालाला मिळाला पाहिजे.उत्पादन खर्च कमी झाला पाहिजे.सर्व सामान्य शेतकऱ्यांना जगणे सुसह्य व्हावे म्हणून काहींना समर्पित भावनेने काम करावे लागेल.तरच समन्यायी चौकट उभी राहू शकेल.शेतीवर लोकसंख्येमुळे आलेले संकट दिवसेंदिवस अधिक गडद होत आहे.शहरी संस्कृती मुळे लागवडीयोग्य क्षेत्र कमी कमी होत आहे.माणसे अधिक आणि साधने तोकडी अशा अवस्थेत समता येऊ शकणार नाही.त्यासाठी धोरणे बदलणे आवश्यक आहे.सर्व सामान्य माणसांच्या कल्याणाचा मार्ग सुकर व्हावा म्हणून तशी धोरणे आखली गेली पाहिजेत.अशा तऱ्हेने शेती आणि शेतकरी केंद्रस्थानी असल्या शिवाय नवी समतावादी व्यवस्था निर्माण होणे शक्य नाही.गावे उध्वस्त करून हा देश कधीच सुखी होऊ शकणार नाही.गावांनी देखील आपले अस्तित्व दाखविण्याची तयारी आता ठेवली पाहिजे.तशी सद्बुद्धी सर्वांना मिळो अशी सदिच्छा.

कौशल्य विकासातून उत्तम शिक्षक घडवा- डॉ.एम.जी.रघुवंशींचे मत



नंदुरबार,दि.८ (प्रतिनिधी)- शिक्षकांसाठी कौशल्य विकासाचे महत्त्व विविध उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केले. शिक्षकाकडे अध्यापनाचे आणि विद्यार्थ्यांना विषय प्रभावीपणे समजावून सांगण्याचे कौशल्य नसेल, तर त्याच्या अध्यापनाचा अपेक्षित परिणाम साधता येत नाही. महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. या उपक्रमांचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करावा आणि एक सक्षम व आदर्श शिक्षक बनावे. असे प्रतिपादन प्रा.डॉ.एम.जी रघुवंशी यांनी केले.

नंदुरबार तालुका विधायक समितीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रथम वर्ष बी.एड. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत व उद्बोधन कार्यक्रम नुकताच उत्साहात पार पडला. संस्थेचे समन्वयक प्रा.डॉ.एम.जी. रघुवंशी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास चौधरी होते.यावेळी प्रथम वर्ष बी.एड.चे समन्वयक प्रा. डॉ. दीपा पाटील, प्रा. डॉ. एन. जी. वसावे, प्रा. डॉ. विनोद रघुवंशी, प्रा. रवींद्र वळवी यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. कैलास चौधरी यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांची ओळख करून दिली. त्यांनी वेळेचे महत्त्व अधोरेखित करत बी.एड.च्या दोन वर्षांच्या कालावधीत केवळ पदवी प्राप्त करण्यापुरते मर्यादित न राहता टीईटी आणि सीटीईटी यांसारख्या शिक्षक पात्रता परीक्षांमध्ये यश मिळवून शिक्षक होण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी प्रयतक्शील राहण्याचे आवाहन केले.

महाविद्यालयाची ओळख ही तेथील गुणवत्तापूर्ण शिक्षकवर्ग आणि उपलब्ध भौतिक सुविधांमुळे निर्माण होत असते. विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात आवश्यक सुविधा आणि मार्गदर्शन उपलब्ध असून, त्यांचा योग्य उपयोग करून स्वतःचे भविष्य घडविण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांचीच आहे, असे मत डॉ. चौधरी यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. स्नेहल अग्रवाल यांनी केली. सूत्रसंचालन प्रा. सुजाता चौधरी यांनी केले, तर प्रा. नीता ठाकरे यांनी आभार मानले.

पटेल सैनिकी शाळेत प्रदूषणमुक्त दीपावलीचा शपथविधी संपन्न

शिरपूर, दि.८- तालुक्यातील तांडे येथील मुकेशभाई आर. पटेल मुला-मुलींची सैनिकी शाळा येथे ३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता विशेष परिपाठाचे आयोजन करण्यात आले. दिवाळीचा आनंदोत्सव पर्यावरणपूरक आणि प्रदूषणमुक्त वातावरणात साजरा करण्याच्या उद्देशाने विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मिळून प्रदूषणमुक्त दीपावलीची शपथ घेतली.

मुंबई उच्च न्यायालयात दाखल एसयुओ मोटो जनहित याचिका क्रमांक १/२०२६ मधील १५ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या आदेशानुसार, तसेच महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण संचालनालयाच्या निर्देशानुसार हा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आला. दीपावलीच्या पार्श्वभूमीवर शालेय विद्यार्थ्यांमध्ये हवा आणि ध्वनी प्रदूषणाबाबत जनजागृती निर्माण करणे हा यामागील मुख्य उद्देश होता.

विशेष परिपाठात मराठी विषय शिक्षक शरद पवार यांनी उपस्थितांना प्रदूषणमुक्त दीपावलीची शपथ दिली. या प्रेरणादायी शपथविधी प्रसंगी प्राचार्य दिनेशकुमार राणा उपस्थित होते. विद्यार्थ्यांसमवेत सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व इतर कर्मचारी यांनी देखील अत्यंत उत्साहाने व जबाबदारीने सहभाग नोंदवत प्रदूषणमुक्त दीपावलीची शपथ घेतली.

याप्रसंगी सतीश सोमवंशी, यतीन पाटील, नंदकिशोर बाविस्कर, शशिकांत जाधव, शरद पवार, स्नेहा बुरसे, वेरोनिका फर्नांडिस, दीपश्री गोसावी, दिप्तीका शेगांवकर, चंद्रसिंग पावरा, सुवर्णा माळी, चैताली बागुल, सुभान दास, मनोज बहारे, अनिल रोकडे, प्रदीप गिरासे आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

पान १ वरुन

चार न्यायाधीशांकडून पश्चिम बंगालमध्ये राजीनामे

प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. न्यायाधीशांच्या या राजीनामा सत्रामुळे विशेषतः मुर्शिदाबाद जिल्ह्यातील लाखो अपीलांचा निपटारा पूर्णपणे ठप्प झाला आहे, कारण यापूर्वी याच जिल्ह्यातील अपीलांची सुनावणी करणारे निवृत्त न्यायाधीश इंद्रजीत चॅटर्जी यांनीही राजीनामा दिला होता. या दोघांशिवाय कलकत्ता उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश टी. एस. शिवगणनम आणि माजी न्यायाधीश रणजित कुमार बाग यांनीही यापूर्वीच वैयक्तिक कारणांचे दाखले देत आपले राजीनामे सादर केले आहेत.

माहितीनुसार, न्यायाधीशांनी अधिकृतपणे वैयक्तिक किंवा कौटुंबिक कारणांचा हवाला दिला असला, तरी या राजीनाम्यांमागे अनेक गंभीर कारणे समोर येत आहेत.यामध्ये दैनंदिन कामकाजासाठी करावा लागणारा २२ ते ८० किलोमीटरचा प्रवास, खराब रस्ते, पायाभूत सुविधांचा अभाव आणि निवडणूक आयोगाच्या डिजिटल संकेतस्थळावरील तांत्रिक अडचणी यांचा प्रामुख्याने समावेश आहे. तसेच, लाखो प्रलंबित अपीलांची सुनावणी अत्यंत संथ गतीने होत असल्याने न्यायाधीशांवर कामाचा प्रचंड ताण निर्माण झाला होता. एकाच महिन्यात मुर्शिदाबाद विभागातील न्यायाधीशांनी एकामागून एक राजीनामे दिल्यामुळे आता एकूण लाख प्रलंबित अपीलांचे काय होणार, याविषयी पश्चिम बंगालच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात मोठी चिंता व्यक्त केली जात आहे.

कंत्राटी कर्मचाऱ्यांना समायोजनात समाविष्ट करा

राष्ट्रीय आरोग्य अभियानात दहा वर्षे व त्यापेक्षा जास्त सेवा पूर्ण केलेल्या,१५०१० कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी अभी संख्या पदे निर्माण करून त्यांचे समायोजन करण्यास मान्यता देण्यात आली आहे,परंतु या निर्णयातून गटप्रवर्तक या पदाला वगळण्यात आले आहे, आम्ही सर्व गटप्रवर्तक देखील २००९ -१०,+ पासून म्हणजे आज १६ अधिक वर्ष सातत्याने एनएचएम मध्ये सेवा देत आहोत संदर्भ क्रमांक एक मधील दिनांक १४/०३/२०२४ च्या निर्णयाप्रमाणे दहा वर्षे सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना समायोजनाचा लाभ देण्याचे तत्व मान्य झाले आहे, कोविड काळात व इतर सर्व आरोग्य मोहिमांमध्ये आम्ही अग्रेसर राहून काम केलेले आहे दहा वर्षाचा निकस आम्ही पूर्ण करत असून आम्हाला या समायोजनातून वगळणे आमच्यावर अन्याय आहे. त्यामुळे आम्ही आपणास विनंती करतो की संदर्भ क्रमांक ३.मधील शासन निर्णयात गटप्रवर्तक या पदाचा समावेश करून आमचे देखील समायोजन करण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव तात्काळ सादर शासनास सादर करावा सन २००९- १० पासून आमची कंत्राटी सेवा दहावर्षे साठी ग्राह्य धरावी. अशी मागणी महाराष्ट्र राज्य आरोग्य खात्यात आशा गटवर्तक संघटनेचे कॉ.राजू देसले, कॉ. वसंतराव पाटील, कॉ. साहेबराव पाटील यांच्यासह कोकिला जाधव. नम्रता पाटील, शोभा कोळी, धनश्री सोनवणे, गायत्री ठाकरे, जयश्री शिरसाट, सुवर्णा पाटील, सुशीला माळी, मालू पवार, छाया बैसाणे, प्रतिभा देसले, स्वाती वाघ, आनिता शिसोदे, सरला बोरसे आदींनी केली आहे.

पान १ वरुन

शेतकऱ्यांच्या गोठ्याला दिलासा देण्यासाठी नियोजन

कमतरता भासू नये, यासाठी कृषी आयुक्तांच्या स्तरावर पशुसंवर्धन विभागाच्या समन्वयाने जिल्हानिहाय आणि पीकनिहाय मागणी निश्चित केली जाणार आहे. महाबीज, राष्ट्रीय बियाणे महामंडळ, एचआयएल, कृभको, एनएफएल, आयएफएफडीसी, भारतीय कृषी संशोधन परिषद आणि कृषी विज्ञान केंद्रांच्या सहकार्याने बियाण्यांच्या उपलब्धतेसाठी कार्यवाही केली जाणार आहे. यामध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना तसेच आवश्यक नोंदणी व परवान्यांच्या अटींचे पालन केले जाणार असल्याची माहिती श्री. जगताप यांनी दिली.

चारा साक्षरतेतून शेतकऱ्यांना बळ

कमी पाण्यात चारा पिकविण्याचे तंत्र शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्यासाठी चारा साक्षरता अभियान राबविण्याच्या सूचना आहेत. यामध्ये लागवड पद्धती, खतांचा संतुलित वापर, पाणी व्यवस्थापन, पेरणीची योग्य वेळ, कापणी, पुनर्वाढ आणि चाऱ्याची साठवणूक याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. उत्पादन खर्च, अपेक्षित उत्पादन, चाऱ्याचे संवर्धन, मूल्यवर्धन आणि अपव्यय टाळण्याच्या उपायांवरही भर राहणार आहे. कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, कृषी विज्ञान केंद्रे आणि कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून प्रशिक्षण शिबिरे व प्रात्यक्षिके आयोजित करण्यात येणार आहेत. नियमित कृषी विस्तार कार्यक्रमांतून अल्प कालावधीतील गवतवर्गीय आणि हंगामी चारा पिकांची माहितीही शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविली जाणार असल्याचे श्री. जगताप यांनी सांगितले.

अंमलबजावणीसाठी संयुक्त जबाबदारी

चारा उत्पादनवाढीच्या उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यासाठी कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या विभागीय, जिल्हा आणि तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश आहेत. कृषी आयुक्तालय स्तरावर संचालक, विस्तार व प्रशिक्षण; विभागीय स्तरावर विभागीय कृषी सहसंचालक; जिल्हास्तरावर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आणि तालुकास्तरावर तालुका कृषी अधिकारी यांना समन्वय अधिकारी (नोडल अधिकारी) म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. धुळे जिल्ह्यात कृषी विभागाशी संबंधित उपाययोजनांच्या समन्वयाची जबाबदारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कृषी आयुक्तांनी आवश्यकतेनुसार स्वतंत्र सूचना द्याव्यात, तसेच कृषी आयुक्त, विभागीय कृषी सहसंचालक आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी नियमित आढावा घ्यावा, असे निर्देश आहेत. महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे आणि संबंधित संस्थांना स्वतंत्र सूचना देऊन क्षेत्रीय यंत्रणेशी समन्वय राखायचा असल्याचे श्री. जगताप यांनी सांगितले.

शिवारात हिरवाई, गोठ्यात समाधान!

शेतकऱ्याच्या संसारात गोठ्यातील पशुधनाला अनन्यसाधारण स्थान असते. शेतीच्या उत्पन्नाला जोड देणारा दुग्धव्यवसाय अनेक कुटुंबांच्या दैनंदिन गरजा भागविण्यास हातभार लावतो. त्यामुळे पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता ही केवळ जनावरांच्या संगोपनाची नव्हे, तर शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक स्थैर्याचीही बाब आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत कमी पाण्यात चारा उत्पादन, आधुनिक तंत्रज्ञान आणि उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर या उपाययोजना शेतकऱ्यांसाठी आशादायी ठरणार आहेत. शेतकऱ्यांच्या शिवारात चाऱ्याची हिरवाई टिकावी, गोठ्यातील पशुधनाचे संगोपन सुलभ व्हावे आणि पशुपालनातून मिळणाऱ्या उत्पन्नाला आधार मिळावा, यासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी महत्त्वाची ठरणार आहे, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सूरज जगताप यांनी सांगितले.

डिजिटल पीक पाहणी ॲपमधील तांत्रिक अडचणीं


करून दिला आहे. त्रिस्तरीय तपासणी आणि ओळख क्रमांकासाठी नवीन कार्यपद्धती यासोबतच, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीच्या नोंदींमध्ये विसंगती आहे, त्यांना केंद्रीय प्रणालीत समाविष्ट करून ओळख क्रमांक देण्यासाठी सरकारने एक नवी प्रमाणित कार्यपद्धती जाहीर केली आहे. ही पडताळणी ३ पातळ्यांवर केली जाईल. पहीली पातळी: ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) कागदपत्रांची तपासणी करून ती प्रणालीत अपलोड करतील आणि चावडीवर यादी प्रसिद्ध करतील. दुसरी पातळी: मंडळ अधिकारी या पुराव्यांची पडताळणी करतील. तीसरी पातळी: तहसीलदार अंतिम छाननी करून मंजुरी देतील, ज्यानंतर शेतकऱ्याला स्वतंत्र ओळख क्रमांक मिळेल.

सत्तर लाख ऑफलाईन सुविधेचा लाभ मिळणारे अंदाजित शेतकरी. वीस ॲपमधील चुकीचे अंतर दाखवणारी तांत्रिक त्रुटी (मीटर). १५ नोव्हेंबर २०२६ : दुष्काळी मदत आणि शासकीय लाभांसाठी ओळख क्रमांक नोंदणी करण्याची अंतिम तारीख.

४३,७२८,३००,००० : रुपये दुष्काळग्रस्त ३०४ तालुक्यांमधील ८७.४५ लाख शेतकऱ्यांना वितरित करण्यात आलेली आगाऊ दिवाळी मदत.

शासनाने स्पष्ट केले आहे की, ही माहिती गोळा करणे केवळ ओळख क्रमांक देण्याच्या उद्देशाने मर्यादित असून, यामुळे शेतकऱ्यांच्या मूळ ७/१२ किंवा मालकी हक्कांवर कोणताही परिणाम होणार नाही

शब्दकोडे क्रमांक.२४८८



आडवे शब्द : १.उपस्थित ३.हवाई जहाज-मराठीत ५.विपुल ८.लज्जा ९.हिंदीत-स्वस्त १०.इंग्रजीत-वडील १२.सदन १३.एकरूप झालेला १५.भिस्त १७.बाहर-विरूद्ध १८.लहान १९.मुलगा २०.तबलजी वाजवतात तो एक ताल २१.आजारी २४.लक्ष्मी २५.संजय दत्त,कूमार गौरव यांचा एक सिनेमा २६.अटलांटीक महासाग व पॅसिफीक महासागर यांना जोडणारा कालवा २७.दर २८.चक्षु ३०.लेखणी ३१.पहाटे आरवणारा पक्षी ३३.पैलवानाचे खादय ३४.संख्या ३५.सातु ३७.धान्य चाळण्याचे साधन ३९.धोबी ४०.लोभ ४१.आमीर खान,काजोल यांचा एक सिनेमा ४२.उदया नंतर येणारा दिवस ४३.मुलायम ४४.लहान कळशी ४५.तोटी ४६.फुलातील पराग कण ४७.तांब्या **उभे शब्द :** १.खाटीक २.न्यायाधीश ३.प्रसार ४.फायदा ५.घटना ६.हिंदू महीन्यातील अकरावा महीना ७.फुले वेचण्याची टोपली ९.युदध ११.श्वास १३.अंगरखा १४.दोस्ती १६.विमानोडडानाची धावपटटी-इंग्रजीत १७.पोर्ट ब्लेअर हे शहर जिथे वसले आहे ते बेट २०.व्दार २१.इटली देशाची राजधानी २२.नाव नसलेले २३.कुरमुरे,शेव,फरसाण आदी मिसळून तयार होतो २५.रूमाली रोटीचा एक प्रकार २६.हिंदीत-पापणी २७.साध्या स्वभावाचा २९.इंग्रजीत-हो ३०.सातारा जिल्हयातील एक तालुका ३१.गोव्यात बोलली जाणारी मुख्य बोली ३२.यश ३४.कंटाळा ३६.कुटूंब ३७.हिंदीत-तांदूळ ३८.विनाश करणारे ३९.परका,पंख ४०.हल्ला ४१.हिंदीत-फळ ४२.डाव ४४.किनार

शब्दकोडे क्रमांक.२४८७ चे उत्तर

वि	रो	ध	क	■	बा	व	डी	■	वि	शे	ष
ला	ल	■	व	री	■	रा	■	प	र	व	ट
सी	■	खो	ड	■	पा	त	क	■	ळा	■	को
■	वे	■	सा	ध	न	■	ली	ला	■	त	न
सौ	त	न	■	र	ग	ड	■	ग	रा	डा	■
दा	न	■	ख	■	ळ	■	सा	व	ज	■	वि
ग	■	स	ब	क	■	स	व	ड	■	ध्या	स
र	वि	वा	र	■	वि	चि	त्र	■	शे	■	र
■	चा	ल	■	ज	मा	व	■	म	जा	क	■
घा	र	■	क	मा	न	■	शि	का	री	■	चे
त	■	का	म	ना	■	द	म	न	■	पा	त
क	ळ	क	ळ	■	मु	ल	गा	■	चा	ल	क

अखिल भा.चित्रपट महामंडळ मुंबई दिग्दर्शन विभाग सदस्यपदी थोरात



भारतीय चित्रपट महामंडळ मुंबई च्या दिग्दर्शन विभागात सदस्य पदी निवड झाली आहे.

याच संस्थेच्या सल्लागार समितीच्या सदस्या विमा अधिकारी व प्रसिद्ध गायिका कथ्थक व गायन विशारद, नृत्यांगना दीप्ती राहुल सुराजीवाले यांची तर प्रसिद्ध गायिका व नवोदित अभिनेत्री सरोज प्रशांत पवार यांची देखील अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या सदस्यपदी निवड झाली आहे . या तिन्हींच्या निवड झाल्यामुळे खानदेशातील सांस्कृतिक चळवळीला निश्चित गतिमानता व चैतन्य प्राप्त होणार असून खान्देशातील कलावंतांना नवे सांस्कृतिक क्षितिज देण्यासाठी आपण मनस्वी प्रयतक करणार असल्याचं विचारवंत, वक्ते,गायक प्रा.डॉ.पंडित घनःश्याम यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज भोसले, राज शिष्टाचार पणन कॅबिनेट मंत्री जयकुमार रावल, मा.आ.कुणाल पाटील, बॉलीवूडचे महान गायक पद्मभूषण उदित नारायण, नितीन गायकवाड, खा.डॉ.शोभा बच्छाव, महेंद्र खैरनार, राजेश पाटील, ॲड. राहुल वाघ यांनी मनस्वी अभिनंदन केले आहे.

धुळे, दि.८- महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण मुंबई (महाराष्ट्र शासन) यांच्या संयुक्त विद्यमानाने निर्मित मनवंत्तर व बंदिनी या चित्रपटाचे सहाय्यक दिग्दर्शक, समकालीन कलाविष्कार विपर्यस्त आणि आव्हाने हा छत्रपती शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि चित्रपटाचे सौंदर्यशास्त्र : आणि समीक्षात्मक रसग्रहण या पुणे विद्यापीठातील अभ्यासपूर्ण शोध ग्रंथाचे लेखक, इंडियन स्कॉलर, संशोधक प्रा.डॉ. पंडित घनःश्याम पुंडलिक थोरात यांची नुकतीच अखिल



प्रकाश में आज- तहकीकात



जितेंद्र संगिता बिजलानी रोनितरॉय- फरहीन डेजी महेश आनंद लक्ष्मी बर्डे महेमूद सत्यन कपूर

भातुकली : मनाच्या सांदीकोपऱ्यातील रेशमी संसार

शैलजा करोडे
नवी मुंबई, मो.९७६४८०८३९१



आज रविवार , आठवडाभराची जास्तीची कामे भराभर उरकण्याचा दिवस . निवांतपणा तर नसतोच .थोडसंही आळसावून कामाची चालढकल केली तर वेळेचं गणित चुकलंच म्हणून समजा .विविध कामांच्या या गर्दीत मोबाईलचा रिंगटोन वाजला .मी फोन उचलला .मामांचा फोन होता . सई , कशी आहेस ग पोरी . बरेच दिवसात गावाकडे आली नाहीस .ताई गेली आणि घराची देखभाल माझ्याकडे आली . तू शहरात राहातेस , नोकरी करतेस .तुझं फारसं येणं होत नाही . आणि अशोक तर परदेशात गेला व तिथलाच झाला . दोन दोन तीन तीन वर्ष भारतात येत नाही . आता मी ही म्हातारा झालोय ग बेटा . एकदा गावी ये व तुमचं घर व जमिनीचं काय करायचं बघ

मामा , पुढील आठवड्यात येण्याचं करते मी प्लॅनिंग . मुलांच्याही परीक्षा आटोपल्यात . त्यांनाही सोबत घेऊन येईन .थोडासा त्यांनाही चेंज मिळेल . गावातील मोकळी हवा मिळेल . हिरवीगार शेतं पाहायला मिळतील व एकूणच ग्रामीण जीवन जवळून पाहाता येईल .

बरं बेटा , वाट पाहातो तुझी . ठेवतो आता फोन .तुझी मामीही तुझी सारखी आठवण काढत असते . रात्री जेवत असतांना डायनिंग टेबलवर गप्पांच्या ओघात नरेशला मी मामांचा फोन आल्याचं व मला बोलावल्याचं सांगितलं . अग , मग जा की .कधी जातेस पुढील आठवड्यातील प्लॅनिंग आहे . रेल्वे टिकीट आरक्षणाचं बघाव लागेल पण सई . एकतर मुलांना लागलेल्या उन्हाळी सुट्या व दुसरं लग्नसराई यामुळे आरक्षण मिळणं कठीण . नरेश , रेल्वेचं जाऊ देत ना ,

आपण प्रायवेट ट्रव्हल्सने निघून जाऊ . थोडे पैसे जास्त लागतील एवढंच . अशा सीझनच्या काळात ट्रव्हल्सवालेही अडवणूक करतात . दुपटीने भाव घेतात .असो. माझं जाणं गरजेचं आहे . मामांनी कळवळून बोलावलंय . ठीक आहे , तू कर तयारी

ट्रव्हल्सने आमच्या गावाच्या फाट्याजवळ हायवेवर आम्हांला सोडलं .गावात जायला कालीपिली टेम्पो ट्रव्हल्स होत्याच . मामा आमची वाटच पाहात होता . मामीही लगबगीने आली . मी व मुलांवरून भाकरतुकडा ओवाळून टाकला .

दमून आलात , हात तोंड धुवून फ्रेश व्हा . मी चहा नाश्ता आणते . मामीने , नाचणीसत्वाचं आंबील बनवलं होतं . मुलांना हा नवीन पदार्थ खूपच आवडला . सई , मग काय ठरवलंस बाई ? मामा कोणी ग्राहक असेल विकून टाकू प्रॉपर्टी , कारण मी तर काही गावात येणार नाही आणि अशोक तर परदेशी स्थायिक झालेला .व्यवहार ठरला कि अशोकलाही कळवते , त्याचं जमलं तर ठीक नाहीतर टपालद्वारे त्याच्या सह्या मागवू .

बरं , तू कर आता आराम आराम नाही मामा . मला घराची चावी द्या . काही क्षण जिथे मी लहानाची मोठी झाले त्या वास्तूत घालवायचे आहेत .

मी घराचा दरवाजा उघडला .मी येणार म्हणून मामीने घराची साफसफाई करवून घेतलेली होती .तुळशी वृदांवनातील तुळशी व अंगणातील बाग तर सुकली होती . तुळशी वृदांवनाखालील गोखल्यात अजूनही दिवा ओशट तेलाचं अस्तित्व जपत पडलेला होता .सायंकाळची शुभंकरोती इथेच तर व्हायची माझी .ओसरीवरून मी आत गेले .दिवाणखान्यातील पलंग ,जवळचं स्टूलावर असलेला बुश कंपनीचा ट्रान्झिस्टर रेडियो , छतावरचा रॅलीफॅन एक एक वस्तू मला ओळख सांगत होती .अरे माझी एक प्राणप्रिय वस्तू इथे असायलाच हवी . मी माजघरात प्रवेश केला .माळ्यावर असेल काय ? मी स्टूल पायाखाली घेऊन शोधू लागले . मला हवी असलेली माझी लाकडी पेटी गवसली व मला जणू स्वर्गसुखाचा आनंद मिळाला .होय , स्वर्गसुखचं गवसलं मला . माझी भातुकली ,त्यात होता माझा पितळेचा स्टोव्ह , पाण्याचा बंब , मातीचे जाते , पाटे वरवंटे ,छोटसं रंगीत पोळपाट लाटणं , मातीची चूल , मातीची शेगडी ,छोटीशी चिनीची कपबशी , केटली आणि बरंच काही . आई वर्ष सहा महिन्यातून नवीन चूल बनवायची .चिकण मातीचा चौकोनी ओटा घालून त्यात सुबक अशी चूल व बाजुलाच वूलही कोरायची .माझाही हट्ट असायचा मलाही चूल हवी , शेगडी हवी.

हिवाळ्यात शेगडी पेटवली कि पितळी तपेल्यात आई वरण शिजायला ठेवायची व आम्ही मुलं शेगडी भोवती बसून अंग शेकत दात घासायचे , चहा प्यायचा अशी कामे करायचो .

शाळा सुटली कि आम्ही आळीतील मुलांची भातुकली याच ओसरीवर छान सजायची .ओसरीच्या या खांबापासून त्या खांबांपर्यंत आईचं जुनेरं पातळ लावून छान रूम तयार व्हायची . मग आमचा स्वयंपाक सुरू व्हायचा .कोणी पुरणं वाटायचं तर कोणी मसाला तयार करायची . कोणी भात शिजवायची तर कोणी भाजी कापायची . आणि मग बसायची आंगत पंगत . सगळे अगदी तृप्तीने ढेकर द्यायचे कि आईची हाक कानी पडायची , सई , अभ्यास नाही काय ? परीक्षा तोंडावर आलीय मग आमचा सगळा संसार पुन्हा या लाकडी पेटीत बंद व्हायचा .

गार वाऱ्याची झुळूक आली तसा जणू माऊलीनेच स्पर्श केल्याचा भास झाला . काय ग आई , मला नेहमी खेळतांना बोलावते आणि खेळ अर्ध्यावर सोडून मला यावे लागते .

अग , मला काही कामात मदत कर . तुलाही शिकायला मिळेल . चल पोळ्या लाटून दे बरं मला . येऊ दे कशाही , वाकड्या असू दे कि जाड असू दे . तुला सवय तर लागेल आणि भातुकलीच्या किचनमधून मी केव्हा खऱ्या किचनमध्ये आले कळलेही नाही .जीवनाच्या या खेळात मिळाला नवीन सवंगडी ज्याच्यासाठी मी माहेर सोडून सासरी आले .भातुकलीच्या खेळात एकोपा होता , सगळ्यांची मते विचारात घेऊन खेळ खेळला जायचा , तसाच जीवनाचा खेळ सुरु झाला .सासूची मर्जी सांभाळ , नणंदेचे टोमणे ऐक , जावांचे हेवेदावे , सगळे सांभाळत नात्यांची बंधने न तुटता ती कशी सांधली जातील हेच मी पाहिले.

पण नात्यांची ही बंधनं स्वार्थानं बरबटलेली , प्रेम मायेला थारा नसलेली , माणुसकीहीन बंधनं होती ही . त्यांना हवा होता माझ्या नवऱ्याचा पैसा , मी त्याची पतकी त्यातील आडकाठी होती आणि माझी मुले तर जणू त्यांचे दुश्मन कारण ते खरे वारसदार . मग काय घरात भांडणं , कुरबुरी , माझ्या नवऱ्याचं माझ्याविषयी मन कलुषित करणं झालं सुरू .

आम्ही तुला लहानाचं शहाणं केलं , तुला शिकवलं आणि काल आलेली ही तुझं सर्वस्व , आम्ही कोणी नाही

आई , असं कोठे म्हणतोय मी . माझी जवाबदारी मी टाळतोय काय . पण सईलाही समजून घ्या ना जरा

अरे व्वा , समजून घ्या , आम्ही काय सासुरवास करतोय कि काय तिला .बाई बाई बाई किती कान भरावे माणसाचे . आता मोठी वहिनीला ही स्फुरण आलेलं वहिनी ,उगाच पराचा कावळा करू नका . ती काही तुम्हांला बोलते काय कि तुमचा दुस्वास करते

अहो मी कोठे म्हणते कि ती दुस्वास करते .पराचा कावळा तर आता तुम्ही करत आहात

नरेश त्या दिवशी चहा नाश्ता न करताच ऑफिसला निघून गेले . मी ही तशीच निघाले .

रोजच्या या कटकटींना कंटाळून शेवटी नरेशने दुसरं बिऱ्हाड थाटण्याचा निर्णय घेतला .सासू व जावेचा जणू तिळपापड झाला , असंख्य शिव्याशाप मला मिळाले. पण नरेशची भक्कम साथ मला होती . माझी संसाराची भातुकली थोडी विखुरली होती स्वार्थलोलुपतेने . एकोप्याला तडा गेला होता , पण माझं घरकुल सुरक्षित होतं .भातुकलीतील ऊन , वारा , पावसानं ते विस्कटलं नव्हतं .

दुपार टळून उन्हे कलतीला लागली तशी मामा आले . काय ग सई , कशात रमलीस ग एवढी , जेवायचाही विसर पडला तुला . तुझी मामी वाट पाहुन थकली . दिवस ढळायला आला तशी म्हणाली , पोरगी जेवायलाही आली नाही हो . भूक लागली असेल तिला , थोडं खायला घेऊन जा आणि येतांना तिला घेऊनच या .

काही नाहीं मामा ,काय पाठवलंय मामीनं बघू . अरे व्वा , माझं आवडतं वालाचं बिरडं आणि तांदूळाची भाकरी मामा , मला येथील कोणत्याच वस्तू न्यायच्या नाहीत , फक्त ही लाकडाची पेटी घेऊन जाईन . घेऊन जा बाई ती पेटी . पण आहे काय त्यात एवढं ? माझा लहानपणीचा खजिना आहे मामा , माझी भातुकली .ज्यातूनच मी सहनशीलता शिकले , आशा आकांक्षाना मुरड घालून नात्यांची बंधन जपायला शिकले .माया , ममता , त्याग , समर्पण , शक्ती , हिंमत आणि खंबीरताही शिकले .हा अनमोल खजिना , मौल्यवान ठेवा मी घेऊन जाते .

आणि होय मामा , माझ्या सोनाली व चिंटूलाही दाखवीन हा खजिना . आजच्या मोबाईल , इंटरनेटच्या दुनियेतील ही मुले असा काही खेळ असतो हेच विसरलीत . पूर्वीसारखं घर , अंगण , मायेची माणसं , आपुलकीही उरलेली नाही , जो तो या गतिमान युगात धावतोच आहे . थांबायचं नावच नाही . पण माझ्या बाळांना मी हा प्रेम मायेचा , आपुलकीचा , एकोप्याचा संसार दाखविन म्हणते जरूर दाखव बेटा . सई , घर , शेत सगळं विकून जाशील पण गावात एक मामा आहे हे विसरु नकोस असं कसं विसरेन मामा . तुमच्याशिवाय दुसरं कोण आहे मला मायेचं म्हणत मी मामांच्या कुशीत शिरले , प्रेमभराने त्यांच्या हात माझ्या माथ्यावर फिरत होता व त्या मायेच्या गंगेत मी अक्षरशः न्हाऊन निघाले होते.

सर्व सभासद, ग्राहक, हितचिंतक व वाचक यांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !

दि हस्ती को-ऑप. बँक लि.
An ISO 9001-2015 Certified Bank
Since 1971
मल्टीस्टेट बँक
मुख्य कार्यालय - 'हस्ती सहकार दिप', स्टेशन भाग, दोंडाईचा, जिल्हा - धुळे (महाराष्ट्र) ४२५ ४०८
visit us:https://hasti.bank.in | customercare@hasti.bank.in

आधारस्तंभ कै. श्री.शांतीलालजी जैन
संस्थापक कै. श्री.हस्तीमलजी जैन
आधारस्तंभ कै. श्री.कांतीलालजी जैन

❋ बँकेची अद्यावत आर्थिक स्थिती ❋
ठेवी - १३४९+ कोटी कर्ज - ८००+ कोटी
स्वनिधी - २५१.०५ कोटी निव्वळ नफा - २४.२७ कोटी
नेट एन.पी.ए. ०% (गेल्या सतत १४ वर्षापासून)

❋ वैशिष्ट्ये ❋
स्थापनेपासुन बँकेला सतत ऑडिट 'अ' वर्ग रु. २१३० कोटी व्यवसायाचा टप्पा पूर्ण ३४ वर्षांपासून सभासदांना १५ टक्के दराने तर सन २०२०-२१ सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त २५ टक्के व सन २०२५-२६ ला ५५ वर्षा निमित्त २० टक्के दराने डिव्हीडंड वाटप
रु. १.२५ कोटी पर्यंत ठेवीसाठी कै. कांतीलाल जी जैन ठेवीदार अपघात विमा योजना (रु. ५०००/- वरील ठेवी साठी लागू)
रु.१.२५ कोटी पर्यंतच्या कर्जास बँकेतर्फे अपघाती विमा संरक्षण लागु प्रधानमंत्री जीवन ज्योती व सुरक्षा विमा योजना उपलब्ध

नजर गहाण कर्ज: किफायतशीर व्याजदर, अत्यल्प प्रोसेसिंग फी, नियमित परतफेड असल्यास रिबेट
सोने तारण कर्ज: 0% प्रोसेसिंग फि, तुमच्या सोन्याला विमा सरंक्षण, त्वरीत कर्ज मुंजरी आणि वितरण
प्रॉपर्टी तारण: किफायतशीर व्याजदर उपलब्ध, किफायतशीर प्रोसेसिंग फी, सुलभ पद्धतीने कर्ज वितरण
औद्योगिक कर्ज MSME अंतर्गत: नविन प्रकल्पाच्या उभारणीसाठी सध्याच्या व्यवसाय विस्तारासाठी, मुदत कर्ज तथा प्रकल्प कर्ज
गृह कर्ज: कर्ज मर्यादा २ कोटी, मुदतपूर्व कर्ज परतफेड केल्यास कोणताही खर्च नाही, कर्जाची मुदत जास्तीत जास्त २० वर्ष
वाहन कर्ज: ८.५०%* खाजगी वाहनावर आकर्षक व्याजदर, ११%* 0% प्रोसेसिंग फि, व्यायसायिक वाहनावर ९.५०%* आकर्षक व्याजदर
*नियम व अटी लागू

37 राष्ट्रीय व 26 राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानीत

नेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, Rupay डेबिट कार्ड, नॅच, यु.पी.आय., क्यु आर कोड, NEFT, RTGS, ऑनलाईन टॅक्स पेमेंट

शाखा परिवार
दोंडाईचा शिंदखेडा सोनगीर नंदुरबार पिंपळनेर साक्री धुळे अक्कलकुवा शहादा जळगांव शिरपूर नवापूर चाळीसगांव अमळनेर सटाणा तळोदा गिरीविहार-नंदुरबार देवपूर-धुळे विसरवाडी निजामपूर पुणे चोपडा नाशिक

प्रतिज्ञा आमची... प्रगती तुमची...!



वचन

त्या दिवशी भर दुपारीच रात्र वाटावी इतके आभाळ दाटून आलं होतं.विचित्र आवाजात पक्ष्यांची अवेळीच कलकल सुरू झाली होती. त्यातच टिटवीचा एखादा सूर काळजाचे ठोके चुकवत होता.जमिनीवरचा पाचोळा गोल-गोल गिरक्या घेत वलयं उठवत होता. समुद्रकिनारी असलेल्या एका छोट्या गावात जया आणि दीपक रहात होतो. नेहमी गंभीर असणा-या समुद्राने त्या दिवशी रूद्ररूप धारण केलं होतं.एरवी सूर्यास्ताच्या वेळी तांबुस सोनेरी भासणारा तर कधी चांदण्या रात्री माडांच्या नागमोडी वाटेवर उल्हसून पुढे येणा-या सागराचे विलोभनीय रूप त्या दिवशी एखादे अक्राळ- विक्राळ श्वापद आपला जबडा पसरवून सर्वांना गिळंकृत करण्यासाठी पुढे-पुढे येत आहे असंच वाटत होतं.काड काड आवाज करत माडाची झाडे भुईसपाट झाली होती. जयाला हे रूप नवीनच होतं.जणू काही आतापर्यंत जे काही सोसलं त्याचा हिशोब रतकाकर मागत होता.तेच वादळ तिच्याही जीवनात येणार असल्याची जयाला सुतरामही कल्पना नव्हती.

त्याच रात्री ब-याच वर्षांपासून अंथरूणाला खिळलेला तिचा जीवनसाथी तिला सोडून गेला होता.परंतु जयाच्या डोळ्यात अश्रुंचा एक थेंबही नव्हता.कदाचित जीवनातले दुःख पचवताना ते कधीच आटले होते.पोटच्या मुलाने आणि सुनेने दिलेल्या वेदनानी तिचं मन भरून आलं होतं.सुटले बिचारे असाच

ऐश्वर्या डगांवकर
पुणे, मो.९३२९७३६६७५

विचार त्याक्षणी तिच्या मनात आला होता. त्याला कारणही तसंच होतं.तीन मुलींच्या पाठीवर जयाला मुलगा झाला होता. मोठ्या हौसेनं दोघांनी मिळून त्याचं नाव जयंता ठेवलं. परिस्थिती साधारणच होती त्यामुळे मुलींचे कधीच कोडकौतुक करता आले नव्हते. जयंता अभ्यासात हुशार होता. त्याला मुंबईला शिक्षणासाठी पाठवलं होतं काटकसर करूनच संसाराचा गाडा सुरळीत पार पडला होता.मुलींना शिकवून त्यांचे लग्न करून दिल्यानंतर थोडा हात मोकळा झाल्यावर त्यांनी त्यांनी छोटसं घर बांधलं होतं.

जयंताही कॉलेजमध्ये प्रोफेसर होता.त्याने प्रेमविवाह केला त्यावेळी दोघांनाही थोडा धक्काच बसला होता .त्यातून सून म्हणजे आरती श्रीमंताची मुलगी असल्याने म नाकापेक्षा मोती जड म ही म्हण तिने सार्थ केली होती. त्यात तिचं दोघांशीही वागणं पण खूप तुटक असायचं. जयंता तर तिच्या ताटाखालचं मांजरच झाला होता.मुलाच्या प्रेमापोटी ते काही बोलू शकत नव्हतो.त्यातून जयंताने दीपक सेवानिवृत्त झाल्या नंतर गोड बोलून घर स्वतःच्या नावावर केव्हा करून घेतलं ते दोघांनाही कळलं नव्हतं. काही दिवसांनी आरतीला मुलगा झाला.त्यांना खूप आनंद झाला ,वाटलं आता तरी आरती त्यांच्याशी चांगलं वागेल.पण कसचं काय, बाळंतपणानंतर खूप दिवस झाले तरी ती घरी येण्याचं नावच घेत नव्हती.तेव्हाच जयाच्या मनात शंकेची पाल चुकचुकली होती.तिने वारंवार जयंताला विचारल्यावर त्याने शेवटी आरतीची अट सांगितली की ती एकाच अटीवर घरी परत येईल जर त्यानेआईवडीलांची रहाण्याची सोय आउट हाऊस मध्ये केली तर.ते ऐकून त्याच दिवशी दीपकची तब्येत खूप बिघडली होती आणि त्याला हृदयविकाराचा झटका आला आणि महिन्याभरातच पक्षाघाताचा पण झटका आला. त्यामुळे त्या दोघांचा भार संपूर्णपणे जयंतावर आला होता. थोडी पेंशन आणि लोकांच्या घरी जेवणाचे डबे देऊन जय कसेबसे दिवस रेटत होती.मुली मदत करायच्या.पण दीपकला संकोच व्हायचा.

अखेर तो दिवस उजाडला होता.रात्री अचानक दीपकची तब्येत खूप बिघडली होती. जया मुलाला बोलावायला गेली.खूप वेळ दार वाजवून पण त्याने दार उघडलं नव्हतं. खूप वेळानंतर सुनेनं दार उघडून त्रासिक भाव चेहऱ्यावर आणून विचारले होते , अजून मेले तर नाही ना ते गेल्यावरच बोलवा रात्रीचं त्रास देत जाऊ नका ते थकून भागून घरी येतात.शांतपणे जगू द्या आम्हाला.

अस बोलून धाडकन जयाच्या तोंडावर दार लावलं होतं.तिचं बोलणं ऐकून काळजात कुणी सुरी खुपसली आहे असच जयाला वाटलं.ती तशीच खोलीत परतली.न बोलताच दीपक समजला होता तरी त्याचे डोळे जयंताला शोधत होते. दीपकच्या डोळ्यात घोर निराशा दाटली होती. अडखळत तो बोलू लागला, राधा..याच दिवसासाठी का देवाकडून आपण मुलगा मागितला होता?त्याच्या हौशी पुरवण्यात मी मुलींच्या इच्छा कधीच पूर्ण केल्या नाहीत आज मला खूप अपराधी वाटत आहे.अशा दिवट्या मुलांपेक्षा तर मुली चांगल्या .त्या आपली किती मदत करतात.राधा मला एक वचन दे मी गेल्यावर माझा अंतिम संस्कार मोठ्या मुलीकडून करवून घे.जयंताकडून नको,तो आपल्याला मेला असच समज.मला वचन दे..रा..धा.. . जयाने दीपकला वचन दिल्यानंतरच त्याने प्राण सोडले .तिने कसेबसे मुलींना फोन करून कळवले होते. पण त्या धक्क्याने मात्र अचानक तिची शुद्धच हरपली होती. सकाळ झाली होती.हळूहळू जया भानावर आली होती..बाहेर बरीच मंडळी जमली होती.मुलीही आल्या होत्या.बाहेरून जयंताचा आवाज येत होता. बाबा रात्रीच गेले .मी डॉक्टराना घेऊन आलो पण त्यापूर्वीच ते गेले किती धादांत खोटं बोलत होता. जयाला ऐकवलं गेलं नाही.ती रागाच्या भरातच बाहेर आल आणि लोकांना सत्य काय ते सांगितलं, धादांत खोटं बोलत आहे हा .रात्री किती वेळा बोलावून देखील आला नाही. देव करो आणि असा मुलगा कुणाला न होवो.याने आमचे काय हाल केले आहे ते एकदा खोलीत येऊन पहा .नावाला देखील औषध मिळणार नाही. आणि हो जयंता तू तर ह्यांना हातसुद्धा लावू नको. आमच्यासाठी तू कधीच मेला .ह्यांनी माझ्याकडून वचन घेतलं आहे की त्यांचा अंतिम संस्कार मोठ्या मुलीने करावा .मी मेल्यानंतरही तू माझा अंतिम संस्कार करू नकोस .तू निघून जा.. !जा...म्हणते ना


म जयंता तिच्या नजरेला नजरही देऊ शकला नव्हता. तो खाली मान घालून बसला होता.लोकांमध्ये कुजबूज सुरू होती.पण जयाने जाणून बुजून दुर्लक्ष केलं आणि ती दीपक जवळ जाऊन बसली .त्याच्या शांत चेह-यावर समाधानाची हलकीशी रेष उमटली असं तिला वाटलं !

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
खलाणे जि.प.गटातील तसेच सर्वे ग्रा.पं.च्या
सर्व नागरिकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!



मा.श्री.शरद पंडीत भामरे (पाटील)
मा.संचालक- कृषी उत्पन्न बाजार समिती,
दोंडाईचा-शिंदखेडा
सरपंच- सार्वे ग्रामपंचायत ता.शिंदखेडा





झाड

बांबू वाढला वाढला
गगनी जाऊनी भिडला
साग सोन्याच्या सारखा
झाला मानवाचा सखा
चिंच लाजरी लाजरी
आंबा लागे गोड भारी
कोकीळच्या गाण्यापरी
त्याची लज्जतच न्यारी
मनालाही गोड करी
लाल तांबूस ती बोरी
त्यांच्या वाचून भासते
उणेपण या शिवारी
जांभूळ जांभूळ कसा
घेई औषधीचा वसा
मधुमेहाच्या भीतीला
देते जांभळ दिलासा
डिंकाचा काय थाट
दात चिकट चिकट
अशा रानमेव्या पुढे
सारे वाटते फिकट
द्राक्षे आंबट आंबट
देह होतसे झिंगाट
जरा आवरा जिभेला
उगा नसता बोभाट
कडू कडू जरी निम
त्याने लाभतो आराम
करू झाडांना प्रणाम
वसे त्यांच्यातच राम

अरुण राठोड,
शहादा मो.
९४२२२६२४९५

श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे
बापूसाहेब शिवाजीराव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालय, धुळे
बापूसाहेब शिवाजीराव देवरे तंत्रनिकेतन, धुळे



1983
S.S.V.P.S. ENGG & POLY. DHULE



अभियांत्रिकी शाखा

पदवी (बी.टेक.)
१) सिव्हील इंजिनिअरींग
२) कॉम्प्युटर इंजिनिअरींग
३) इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकॉम
४) इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग
५) मेकॅनिकल इंजिनिअरींग
६) इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कॉम्प्युटर इंजिनिअरींग

पदव्युत्तर (एम.बी.ए.)
१) ह्युमन रिसोर्स
२) फायनान्स
३) मार्केटींग


पी.एच.डी.
१) सिव्हील इंजिनिअरींग
२) कॉम्प्युटर इंजिनिअरींग
३) इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकॉम
४) मेकॅनिकल इंजिनिअरींग

तंत्रनिकेतन शाखा
१) सिव्हील इंजिनिअरींग
२) कॉम्प्युटर इंजिनिअरींग
३) मेकॅनिकल इंजिनिअरींग

मा.श्री.दादासाहेब सुभाष शिवाजीराव देवरे
चेअरमन,
चेअरमन, सर्व मा.सदस्य कॉलेज एक्झीक्युटीव्ह कमिटी,
प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

श्री.शि.वि.प्र.संस्थेचे
बापूसाहेब शिवाजीराव देवरे अभियांत्रिकी म

Happy Diwali
RMPCL
COMMITTED TO QUALITY
VISION OF NUTRITION
VISION OF A STRONGER NATION



R.M.PHOSPHATES & CHEMICALS PVT. LTD. CUSTOMER CARE : 8956926412 rmphosphates.com

सण आणि संस्कृती

महेश वैजापूरकर
डोंबिवली

भारत हा शेतीप्रधान देश आहे आणि ही भूमी संतांची आहे म्हणून प्राचीन काळापासून हिंदू धर्मात अनेक पवित्र सणांना अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. सणांच्या माध्यमातून त्यांचे महत्त्व व आपल्या संस्कृतीचे संस्कार आजच्या तरुण पिढीला जाणून घेणे अतिशय आवश्यक आहे.

आता आपण पाहूया की नवीन वर्ष सुरू झाले की क्रमाने येणारे हिंदूंचे सण व संस्कृती. प्रथम येते मकर संक्रांत या सणा नंतर दिवस हळूहळू मोठा होत जातो व रात्र लहान होते. मुले पतंग उडवू लागतात सगळीकडे खूप आनंदाचे वातावरण असते व उत्साहाने सर्व नाती एकमेकांना भेटून तिळगुळ घ्या-गोड गोड बोला असे म्हणत सण साजरा होतो. त्याचप्रमाणे प्रत्येक हिंदू सणांचे महत्त्व ऋतूप्रमाणे व निसर्गाच्या वातावरणानुसार खाद्यपदार्थांचे पण महत्त्व असते. संक्रांतीच्या दिवसात थोडी थंडी असते म्हणून तीळगूळ व गुळाची पोळी आपण करतो आणि प्रत्येक सणानुसार पूजा केली जाते.

नंतर येतो गुढीपाडवा म्हणजे मराठी नवीन वर्ष, सर्वत्र उत्सवाचे वातावरण, परंपरेनुसार नवीन कपडे घालून गुढी उभारून नवीन वर्षाचे स्वागत करतो काही ठिकाणी शोभायात्रा निघते, विविध सांस्कृतिक कार्यक्रम करून सण साजरा केला जातो. पुढे रामनवमी, हनुमान जयंती, होळी, गोकुळाष्टमी, नारळी पौर्णिमा (रक्षाबंधन), गणेश उत्सव, नवरात्र, दसरा, दिवाळी आणि कोजागिरी असे धार्मिक अनेक सण हिंदू संस्कृतीमध्ये प्रत्येकाच्या परिस्थितीनुसार सणांचे पवित्र ठेवून साजरे केले जातात त्यामुळे आपल्या मुलांवर चांगले संस्कार व मराठी संस्कृतीचे धडे त्यांना मिळतात. सण साजरा झाला खूप मोठा उत्सव केला की तो दिवस संपला आता आपले काम झाले असं नाही किंवा त्या दिवसापुरता उदा. रामनवमी, नामाचा जप केला प्रवचने वाचली की झाले असे नव्हे. रोज नित्याने कामात राहून देवाचे नाव घेतले तर आपले सर्व दुःख कमी होऊन काम सुलभ होतात कारण नामात फार मोठी शक्ती आहे हेच आपले संस्कार आणि संस्कृती आहे. आपण होळी हा सण का साजरा करतो कारण त्यामागे असा उद्देश (संदेश) आहे की सर्व पाप, वाईट प्रवृत्ती यांचा नाश होऊन चांगल्या विचारांचे ध्येय समोर ठेवून एक संकल्प आपण करतो त्यामध्ये एकमेकांबद्दल असणाऱ्या शत्रुत्वाचा आपण होळीत अर्पण करून त्याचा नाश होतो व मित्रता, बंधुभाव आणि प्रेम निर्माण होऊ दे अशी प्रार्थना करतो . या सणांमध्ये होळी रे होळी - पुरणाची पोळी असा जल्लोष करतात म्हणजे पुरणपोळीला विशेष महत्त्व असते व त्याचा प्रसाद होळीला दाखवला जातो हे आपले संस्कार आणि संस्कृती आहे.

ज्याप्रमाणे प्रत्येक महिन्यात सण येतात त्यानुसार त्या सणाचे महत्त्व असते त्यातील काही सण गावी उत्साहात साजरे केले जातात. विशेषतः कोकणात होळी व गणेश उत्सव मोठ्या प्रमाणात आनंदाने सगळे मिळून साजरे करतात. नंतर येते रंगपंचमी हा संण तरुणांच्या खूप आवडीचा की ज्याची ते खूप वर्षभर आतुरतेने वाट पाहतात अगदी लहान मुले सुद्धा त्यामध्ये सामील होतात व रंगीबिरंगी गुलाल उधळून रंगपंचमी साजरी करतात.

पुढे वर्षा ऋतूतील अत्यंत पवित्र समजल्या जाणाऱ्या श्रावण मासाची सुरुवात होते आणि मराठी संस्कार व संस्कृतीतून सणांना सुरुवात होते. श्रावणातील निसर्ग सौंदर्य, सण - उत्सव आणि मनाला भुरळ घालणाऱ्या वातावरणाचे अत्यंत सुंदर असे दृश्य आपल्याला पाहावयास मिळते. श्रावण महिन्याचा महिमा किती सांगावा तेवढा थोडाच आहे. पावसाच्या आगमनाने सर्वत्र हिरवागार निसर्ग नटलेला असतो. श्रावणाच्या सरी येतात ऊन पावसाचा खेळ चालतो. हिंदू संस्कृतीमध्ये सांगितल्याप्रमाणे अनेक पूजा, व्रतवैकल्य करून पुण्य मिळवण्याकरता दानधर्म करतात त्यामुळे या महिन्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सर्व महिला वटपौर्णिमा हा सण आनंदाने साजरा करतात हे आहेत संस्कार व हिंदूंची संस्कृती.

यापुढे सर्वांचा आवडता ज्याची वर्षभर उत्सुकतेने वाट पाहतात तो सण म्हणजे गणपती उत्सव. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला प्रथम हा सण घराघरातून करत असे नंतर या सणाला सार्वजनिक स्वरूप प्राप्त झाले आणि मोठ्या प्रमाणात कार्यक्रम करण्यास सुरुवात झाली. नंतर नवरात्री उत्सव म्हणजे नऊ रात्र देवीची उपासना अखंड करणे त्याचबरोबर गर्भा खेळून देवीला प्रसन्न करणे ही त्या मागची भूमिका असते. या सणांच्या संस्कृती मागे एकच हेतू आहे की या सणांचे महत्त्व सर्वांना कळले पाहिजे. पुढे येतो दसरा (विजयादशमी) या सणाचे पवित्र वैशिष्ट्य हिंदू धर्मात खूप महत्त्वाच आहे कारण या दिवशी प्रभू श्रीराम रावणा विरुद्ध युद्ध करून त्याच्या अहंकाराचा नाश (वध) करून अयोध्येला परत आले. हिंदू संस्कृतीमध्ये त्यादिवशी सिमोलंघन करण्याची प्रथा आहे. सिमोलंघन करून आल्यावर घरातील स्त्री ही औक्षण करते व नंतर घरात पुरुष प्रवेश करून आनंदाने सण साजरा केला जातो ही या सणाची संस्कृती व संस्कार आहेत.

यानंतर येणारा सण म्हणजे दिवाळी (दीपावली) म्हणजे सगळीकडे रोषणाई, नवीन वस्तू खरेदी करून अतिशय उत्साहाने हा सण साजरा करण्यात येतो. चारही दिवसांचे महत्त्व व या सणाची हिंदू संस्कृतीप्रमाणे पूजा करण्यात येते. ज्याप्रमाणे रक्षाबंधन त्याचप्रमाणे भाऊबीज या सणाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. बहिण वाट बघत असते की आपले रक्षण करणारा भाऊ येणार व व एक अनमोल प्रेमाची भेट आपल्याला देणार याची तिला खात्री असते. प्रत्येकाच्या आयुष्यात कधीही न विसरणारा असा भाऊबीज हा सण दिवाळीत साजरा केला जातो. ही या सणाची हिंदू संस्कृती व संस्कार आहे. अशा प्रकारे हिंदू धर्माची शिकवण, सण व संस्काराचे वैशिष्ट्य आहे त्यामागील एकच उद्देश आहे की आपल्या भारतातील सर्व समाजातील लोकांनी कुठलाही प्रकारचा भेदभाव न ठेवता समानता, बंधुप्रेम आणि माणुसकीला धरून सर्वांनी वागावे व सण साजरे करावे जेणेकरून आपल्या देशातील सर्व भगिनींना ताठमानाने जगता येईल.

मला असे वाटते की कुठल्याही श्रीमंतीपेक्षा सणांच्या संस्काराची श्रीमंती खूप मोठी आहे. कुठल्याही प्रकारे अतिशयोक्ती न करता जेणेकरून अन्नाचे नासधूस, नुकसान होईल असे प्रकार टाळून सर्वांनी एकत्र आपुलकीने सण साजरे केले तर नक्कीच आपला देश एक प्रगतशील महान भारत होण्याचे उद्याचे स्वप्न पूर्ण होईल. माणूस श्रीमंत किंवा गरीब पैशाने ओळखला जात नाही तो संस्काराने ओळखला जातो असे आपल्या सणांचे महत्त्व आहे. आज परिस्थितीमुळे व शर्यतीच्या जगात मुले आपल्यापासून लांब जातात त्यांना सण साजरे करायला वेळ नसतो पण जे सण व संस्कार लहानपणापासून झालेले असतात ते कधीही विसरू शकत नाही. जगाच्या पाठीवर कुठेही गेलात तरी आपल्या वागण्यावरून लोक ओळखतात की या मुलावर आजी-आजोबांनी व आई-वडिलांनी चांगले संस्कार घडवलेले आहेत. असे नाही की कोणीही सण करतच नाहीत. आज जे हिंदू (मराठी) बांधव परदेशात कामानिमित्त आहेत त्यांना आपल्या सणांचा खूप अभिमान आहे आणि आठवण आली की ते तिकडे सण साजरे करतात हे आपले संस्कार आहेत. शेवटी सण आणि संस्कृती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.



हास्य कॉर्नर : प्रशांत आष्टीकर




साक्री तालुक्यातील तमाम
जनतेला व शेतकरी बांधवांना
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

आमचे प्रेरणास्थान — मा.बापूसाहेब शिवाजीराव दहिते, मा.अध्यक्ष, जि.प.धुळे
आमचे मार्गदर्शक — मा.बाबासो. सचिन दहिते
आमचे नेते — जिभाऊसो. हर्षवर्धनजी दहिते, मा.सभापती जि.प.धुळे



श्री.सागर काकुस्ते
* उपाध्यक्ष- साक्री ता.मराठी पत्रकार समन्वय समिती
* गटनेता- शेणपूर ग्रामपंचायत शेणपूर ता.साक्री
* गव्ह.कॉन्ट्रॅक्टर, साक्री तालुका

साक्री तालुक्यातील तमाम शेतकरी बांधव व नागरिकांना
दिपाबलीच्या हार्दिक शुभेच्छा!
शेतकरी सहकारी संघ लि.साक्री जि.धुळे


मा.बापूसाहेब शिवाजीराव दहिते
मा.अध्यक्ष जि.प.धुळे

चेअरमन

श्री.शिरीष आनंदराव सोनवणे

व्हा.चेअरमन

श्री.प्रदिपकुमार किशोर नांद्रे


जिभाऊसो. हर्षवर्धनजी दहिते
मा.सभापती जि.प.धुळे

सन्माननीय संचालक मंडळ
श्री.उमाकांत लक्ष्मण पाटील
श्री.विश्वास हिरामण पदमोर
श्री.अनिल दयाराम शिंदे
श्री.दिनेश यादवराव सोनवणे
श्री.ॲड.नरेंद्र उत्तमराव मराठे
श्री.उल्केश उत्तमराव देसले
श्री.विजय साहेबराव बागुल
श्री.विलास गुलाबराव देसले
श्री.नयनेश भिमराव भामरे
डॉ.माणिक धोंडू मारनर
श्रीमती विमलबाई गोरख अहिरराव
श्रीमती संध्या अरुण अकलाडे
श्री.शशिकांत विजय भामरे
श्री.अबुअली अनवर खाँ पिंजारी
श्री.दिपक लक्ष्मण साळुंके (मॅनेजर)
कर्मचारी वृंद, शेतकरी सहकारी संघ लि.साक्री जि.धुळे

साक्री तालुक्यातील तमाम
जनतेला व शेतकरी बांधवांना
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

आमचे प्रेरणास्थान — मा.बापूसाहेब शिवाजीराव दहिते, मा.अध्यक्ष, जि.प.धुळे
आमचे मार्गदर्शक — मा.बाबासो. सचिन दहिते
आमचे नेते — जिभाऊसो. हर्षवर्धनजी दहिते, मा.सभापती जि.प.धुळे



श्री.चंद्रकांत पवार
मंडळ अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी (जैताणे मंडळ)

आमचे नेते

मा.जयकुमार रावल
पालकमंत्री

शिंदखेडा तालुक्यातील
तमाम जनतेला
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!


श्री.डी.आर. पाटील (देवाबापू)
चेअरमन : सप्तर्षी ग्रामीण पतसंस्था, वर्षी
चेअरमन : सप्तर्षी इंग्लीश मेडियम स्कूल, वर्षी
वृक्षमित्र : निसर्गमित्र, कुणबी पाटील, भुषण पुरस्कार.
लोकमत कृषीरत्न पुरस्कार, ॲग्रोवर्ल्ड कृषी गौरव पुरस्कार, राज्यस्तरीय शिवपुत्र महाराष्ट्र गौरव पुरस्कार


सौ.ज्योती देविदास पाटील
सभापती : महिला व बालकल्याण समिती
जिल्हा परिषद, धुळे

दिवापली निमित्ताने आमचे असंख्य ग्राहक
व हितचिंतकांना हार्दिक शुभेच्छा..!

उत्पादक-
* सिमेंट चौकट
* रबर मोल्डींग
* फोल्डींग
* खिडकी
* फेनिसिंग पाल
* Y पोल
होलसेल भावात मिळतील.



रेडिमेड भिंत व तार कम्पौंड तयार करुन मिळण्याचे एकमेव ठिकाण

वेदांत सिमेंट प्रॉडक्टस्

प्लॉट नं. जी ५०, संजय सोयाच्या पाठीमागे, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे,
फोन :- ०२५६२-२३९८१०, मो.९९२२७९२७७७
प्रोप्रा : राजू लगडे (९१४५५२६७११)
संतोष लगडे (९८२३०५५७११/७७२१९०१६११)

दिवाळी

विजया भट, धुळे

दीपावली किंवा दिवाळी म्हणजे भरपूर दिवे उजळून अंधाराकडून प्रकाशा कडे नेणारा सण! दिवाळी सणाची परंपरा दोनतीनहजारवर्षांपूर्वीपासूनचीखूप दिवे लावून अंधार नष्ट व्हावा म्हणून दीपावली सणाला सुरूवात झाली असावी. काही जाणकार म्हणतात श्रीरामचंद्र वनवासातून जेव्हा अयोध्येत परत आले तेव्हा नगरवासियांनी दिवे उजळून रामरायाचे स्वागत केले. कोणी म्हणतात गौतम बुद्धाचे स्वागत करण्यासाठी त्यांच्या अनुयायांनी लाखो दिवे प्रज्वलीत केले तीच ही दिवाळी.

दिवाळीची अशा अनेक कथा आहेत असल्यातरी अंधाराचे, अज्ञानाचे साम्राज्य दूर करून साऱ्यांना प्रकाशाकडे, आनंदाकडे नेणारा, नाती जपणारा दिवाळी हा सण आहे. हा सण अश्विन - कार्तिक महिन्यात येतो. हा काळ समृद्धीचा असतो. आनंद साजरा करावासा वाटतो. दिवस लहान होत जाणार असून, प्रकाशापेक्षा अंधाराचा कालावधी वाढणारा असल्यामुळे दिव्यांची गरज जास्त पडणार असते म्हणून दिव्यांचा प्रकाशाचा सण सुरू केला असावा.. आपल्या संस्कृतीतील दिवाळी या सर्वात मोठा सण, म्हणजे सणांचा राजाच. आमच्या लहानपणीचा काळ.दसरा झाला आणि दूरदर्शन वरती जाहिरात झळकू लागते उठा!उठा! सकाळ झाली,मोती सक्कनाची वेळ झाली! अशी आरोळी देत एक लहान मुलगा चाळ भर फिरत सर्वाना मोती साबण वापरा हा संदेश देतो आणि दिवाळी जवळ आल्याची बातमी सांगतो. आज वर्षानुवर्षे ही जाहिरात दाखवली जाते. पूर्वीचा लहान मुलगा बाबा होऊन त्याच्या मुलाला हा संदेश द्यायला सांगतो आणि मोती साबण वापराची परंपरा मुलाकडून चालवतो. ही जाहिरात येऊ लागली की, सहामाही परीक्षेची तयारीला लागावे लागत असे.संध्याकाळी मित्र, मैत्रिणी जमले की, नवीन कपडे, फटाके, किल्ले याची चर्चा लहान मुलांमध्ये सुरु व्हायची. सर्व गृहिणी दिवाळीचे बजेट करायच्या. मुलांना कोणते कपडे आणायचे, काय पदार्थ, त्यांची तयारी काय करायची, केव्हा करायची त्याची आखणी करू लागत. आलेला बोनस आईला दिला की मग आईची खरेदीला सुरुवात व्हायची. बाजारातून कापड आणायची आणि आम्हा तिघी बहिणींना ती घरीच फ्रॉक शिवायची. बँड पार्टीच जणू...

खिसा असलेले , फुगा बाहीचे फ्रॉक पाहिले की,आनंद वाटत होता आई एकीकडे भाजण्या,अनारश्याचे पीठ करणे, कोरड्या खोबऱ्याच्या करंजीचे सारण करून ठेवणे अशी तयारी करायची.. परीक्षा संपली की आम्ही मुले विटा, दगड,माती, पोती गोळा करून किल्ले करायला सुरुवात करत होतो. किल्ला झाला की त्यावर मोहरी पेरून त्याला रोज पाणी घालायचो. किल्ला हिरवाईने नटत असे. गडावर विहीर असे. शिवाजी महाराजांचे सिंहासन, तट, बुरुज,गुहा सर्व करत होतो. कधी वाघ,सिंह,गायी , मावळे,शिवाजी महाराज किल्ल्यावर बसवले की सगळ्यांचा आनंद गगनात मावेनासा व्हायचा. त्याकाळी मोबाईल नसल्यामुळे त्याचे फोटो नाहीत. स्वतः ग्रीटिंग कार्ड तयार करून म ही दीपावली आपणा सर्वांना सुख, समृद्धी, आरोग्याची, आनंदाची जावो,फ असे लिहिताना आनंद होत असे. ही ग्रीटिंग कार्ड जवळच्या नातेवाईकांना पोस्टाने पाठवत असू स्वनिर्मितीचा आनंद असे त्यात. आम्हालाही आलेली ग्रीटिंग्ज जपून ठेवत होतो. दिवाळीच्या आधी चार दिवस आई फराळाचे करायला सुरुवात करत असे. शेजारणी एकमेकींच्या सल्ल्याने होत असे.. जा शेजारच्या मावशींकडून सोऱ्या घेऊन ये. त्यांच्या सोऱ्याने चकली छान पडते ताई माझे कातणे सापडत नाही आहे देता का जरा. आज दुपारी करंज्या करायला मदतीला याल का? अशी एकमेकींबरोबर देवाण-घेवाण करणे यात आपुलकी होती . एकमेकांना मदतीला जात असत. गप्पा टप्पा, एकमेकींना पदार्थाच्या टिप्स देणे, पदार्थ फसला तर सगळ्यांनी मिळून त्याला सुधारत असे. एकमेकींच्या विचाराने हे होत असे. तेव्हा पदार्थ हे अनेक किलोच्या प्रमाणात केले जायचे कारण ते वर्षातून एकदाच व्हायचे.

अनेक किलोच्या प्रमाणात केले जायचे .. दोन-तीन प्रकारचे लाडू, दोन प्रकारचा चिवडा ,करंज्या चकल्या, कडबोळी, गोड - खारी शंकरपाळी, अनारसे, चिरोटे, शेव हे सारे पदार्थ दिवाळी शिवाय तयारच होत नसत म्हणून या पदार्थांचे अप्रूप होते. अनारसे,करंजी, बेसनलाडू असे पदार्थ आई नैवेद्यासाठी म्हणून वेगळे काढून ठेवत असे. सर्वांच्या दरवाज्यात रोषणाई केली जायची, विजेच्या माळा लागत. आकाश कंदील प्रत्येकाकडे असत. अनेक जण हाताने तयार करत असत. दारात, अंगणात रांगोळी सजत असे. रांगोळी काढायला, रंग भरायला मुली एकमेकींना मदत करीत.दिवाळी म्हटले की फटाके आलेच फुलबाज्या,भुईनळे,टम बॉम्ब, सुतळी बॉम्ब,भुईचक्र,सुदर्शन चक्र,नाग गोळ्या, पानपट्टी, रंगीत कांडेपेट्या असे विविध फटाके पुरवून चार दिवस लावले जात. वसुबारस आली की आई उपास करायची संध्याकाळी गाय गोऱ्हाची पूजा करून मगच उपास सोडत असे. धनाची पूजा करण्याचा, तसेच देवांचा वैद्य धन्वंतरी याच्या पूजनाचा दिवस. धने आणि गुळाचा नैवेद्य दाखवून तो सर्वाना खायला द्यायचे. नरक चतुर्दशी पासून खरी दिवाळी सुरू होते. कडाक्याच्या थंडीत फटाक्याच्या प्रचंड आवाजाने जाग येई. आम्ही उठायच्या आधीच आईने दारात पणत्या लावलेल्या असत.पाटाभोवती रांगोळी घालून त्यावर बसायला लावून आई अंगाला सुगंधी तेल,उटणे लावून, मोती साबणाने अभ्यंगस्नान घालत असे. छान सुगंध दरवळत असे. अंघोळ चालू असताना ती निरंजनाने ओवाळीत असे. या दिवशी सर्वांनी मंदिरात जाऊन देवदर्शन करायचे असा नेम असे. तेव्हा नवीन शिवलेले कपडे घालायला मिळत असत. थोड्यावेळ फटाके उडवले की. देवाला जाऊन यायचे. तो पर्यंत आईने पाटाभोवती छान रांगोळ्या घातलेल्या असायच्या . त्याच्यासमोर उदबत्ती लावलेली असे .फराळ तयार करताना आई म्हणायची देवाला नैवेद्य दाखवल्या शिवाय खायला मिळणार नाही. चार दिवसांच्या प्रतीक्षेने फराळाने भरलेली ताटे समोर आली की खूप आनंद होत असे.खमंग, रुचकर, चविष्ट पदार्थ खाऊन,प्रत्येक पदार्थाची चव घेताना आईचे कौतुक सर्वजण करत होते ते ऐकून आईला आनंद वाटत असे.शेजारणींकडून दोऱ्याच्या विणकामाने तयार केलेल्या रुमालाने झाकलेली फराळाची ताटे येत असत. त्या ताटांमध्ये आमच्या घरचे पदार्थ जात असत.आलेले पदार्थ खाताना चांगल्या, चवीष्ट फराळाच्या कौतुका बरोबर कुणाच्या चकल्या मऊ झाल्या, कुणाच्या चिवट, कुणाच्या चकल्यांनी यथेच्च तेल प्यायले, कुणाच्या करंज्या अगदी खुळखुळ्या सारख्या झाल्यात,चिवडा फारच मसालेदार झाला असे म्हणता म्हणता तो ही फराळ आवडीने, प्रेमाने खाल्ला जाईव्यापारी आणि प्रत्येक घरासाठी लक्ष्मीपूजन हा दिवस अत्यंत महत्वाचा समजला जातो. घरोघरी तिन्हीसांजेला लक्ष्मीपूजनाची तयारी असे. लक्ष्मीला आकर्षित करण्यासाठी सारे आपले घरदार सजवित असत...लक्ष्मी असलेली चांदीची नाणी, एखादा दागिना, नथ,केरसुणी यांची पूजा केली जात असे. बत्तासे, साळीच्या लाह्या, पेढे, अनारसे, बेसनलाडू असा नैवेद्य दाखवला जाई.नंतर एकमेकांकडे हळदीकुंकू असे. घरातील सर्व बायका भरजरी साडी, नाकात नथ, भरपूर दागिने ल्यालेल्या सर्व बायका अजूनही डोळ्यापुढे दिसतात. दुकानांची लक्ष्मी पूजा झाली की हजाराच्या माळा लावल्या जात. कानठळ्या बसवणारा आवाज आणि फटाक्याचा वास आसमंतात भरून जाई.

दिवाळीचा पाडवा पतिपतकी यांच्या नात्याचा हा मंगल दिवस. साडेतीन मुहूर्तातील मुहूर्त. या दिवशी पतकी आपल्या पतीला ओवाळते. प्रीती मांगल्याचा हा दिवस. पती पतकीला भेटवस्तू देऊन खुश करतो.. त्या काळात अगदी मोगऱ्याचा गजराही भेट दिला जाई .. त्यातही आईला आनंद होई...भेट देऊन दोघातील प्रेम व्यक्त होत असे.. नवविवाहितांचा सासुरवाडीत हा सण जोरात असतो.लेक जावयाला सोन्याचा दागिना दिला जातो.अर्थात जशी परिस्थिती असेल तसा आहेर दिला जातो. दिवाळीचा शेवटचा दिवस यमद्वितीया म्हणजेच भाऊबीज. या दिवशी यम आपल्या बहिणीकडे म्हणजे यमीकडे जातो त्यामुळे नरकातील लोकांना नरकयातनातून सुटका मिळते असे मानले जाते. भाऊ बहिणीच्या निर्मळ नात्याचा हा सण!सकाळी भावाला पाटावर बसवून तेल लावण्याचा कार्यक्रम होत असे. संध्याकाळी औक्षणाच्या वेळी दहा, वीस रुपये भाऊबीज मिळाली तरी खूप वाटत असे. भावाबहिणींची माया निरंजनातील वाती सारखी उजळून निघत असे.लांबचे भाऊ मनिऑर्डरने पैसे पाठवत असत. पोष्टाने कसे पैसे येतात असे तेव्हा वाटत असे. दिवाळीचा शेवटचा दिवस असल्याने उरलेले सर्व फटाके उडवून टाकले जात.असा हा आनंदाचा, जल्लोषाचा, उत्साहाचा, सर्वांच्या आवडीचा सण.पाच दिवस रोज जेवायला जिलबी, बासुंदी, गुलाबजाम असे गोड पदार्थ केले जात.दिवाळी संपल्यावर तिखटाचे पदार्थ संपविण्यासाठी आई मिसळ करत असे.घरोघरी दिवाळी अंक येत. त्यातील लहान मुलांचे सदर आम्हाला वाचावेच लागे. दिवाळी संपली की किल्यात ऍटोमबॉम्ब लावून किल्ला उडवून दिला जाई आणि सर्वांनी मिळून सर्व साफसफाई केली जाई. आता शाळेतून दिलेला दिवाळीचा अभ्यास म्हणजे मराठी, इंग्रजीचे शुद्धलेखन,जोडाक्षरे लेखन,पाढे हे सर्व तारखेनुसार लिहावे लागे. शाळा सुरु झाल्यावर दोन दिवसात वह्या तपासायला दिल्या जात. नाही केला तर छड्या बसत.. बालपणातल्या दिवाळींनी आम्हाला आयुष्यभर पुरेल इतका आनंद दिला ,पण भाऊ-बहीण, पती-पतकी, कुटुंब, शेजारी पाजारी यातील परस्पर प्रेमाचे संस्कार दिले मैत्रीचे धागे घट्ट केले गेले . टीम स्पिरीट शिकवलं ग्रीटिंग कार्ड,आकाशकंदील, रांगोळीतून कलेचे संस्कार केले, पाक - कौशल्याचे धडे दिले. आपापल्या परिस्थितीप्रमाणे सुख आनंद उपभोगायला शिकवलं. आम्ही मोठे झालो, आर्थिक परिस्थिती सुधारल्या. जास्तीत जास्त स्त्रिया नोकरी करू लागल्या. किल्ल्यासाठी लागणारी माती आता कुठून आणायची हा प्रश्न पडल्यामुळे दिवाळीचे किल्ले बनवण्यापेक्षा घरोघरी तयार किल्ले येऊ लागले. आईने शिवलेल्या फ्रॉक पेक्षा रेडीमेड कपडे आवडू लागले. ग्रीटिंग कार्ड, आकाश कंदील तयार असलेलेच घरी आणणे सोयीचे होऊ लागले. फराळाचे पदार्थ बाजारातील किंवा ऑर्डर देऊन करून घेऊ लागले. वर्षभर सर्व खाद्यपदार्थ विकत मिळत असल्याने त्याचे अप्रूप राहिले नाही. वर्षभर कपडे घेत रहातात त्यामुळे दिवाळीत नवीन कपडा मिळण्याचे नाविन्य राहिले नाही. मातीच्या पणत्या ऐवजी मेणाच्या पणत्या लावणे सोईचे वाटू लागले. दारात नक्षीच्या चाळण्यांची रांगोळी किंवा रांगोळीचे स्टिकर्स मिळू लागले. रेडिमेड रांगोळ्याही मिळू लागल्या...ग्रीटिंग कार्ड आणि शुभेच्छा देण्यापेक्षा व्हाट्सअप वरती शुभेच्छा देणं सुरू झाले. दिवाळी अंक स्वरूपात येऊ लागले. पाडवा भाऊबीज आता मोठ्या स्वरूपात भेटवस्तू मिळू लागली दिवाळीच्या सुट्टीत एखाद्या पर्यटन स्थळी जाण्याची प्रथा वाढू लागली,हॉटेलमध्ये जाणे पसंत करू लागले. फटाक्याचे आकर्षण आणि महत्त्व अजूनही तसेच आहे. अगदी प्रदूषण होत असले तरीही. दिवाळीचे प्रत्येक दिवस मात्र साजरे केले जातात. नाती जपली जातात हे महत्वाचे. काळा बरोबर सारं बदलंत आहे मग दिवाळी अपवाद कशी असेल. म्हणून जुन्या नव्याचा मेळ घालत चालत रहायच आणखी काय? सर्व रसिक वाचकांना यंदाची दिवाळी सुखाची आनंदाची आणि भरभराटीची जावो हार्दिक शुभेच्छा!









एच.आर.पटेल फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची विद्यापीठस्तरीय स्पर्धेत निवड



शिरपूर, दि.८ : शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित एच.आर.पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च या औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील पदवी, पदव्युत्तर आणि संशोधन स्तरांवरील एकूण विद्यार्थ्यांची उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत आयोजित अविष्कार २०२६-२७ या विद्यापीठस्तरीय संशोधन स्पर्धे साठी निवड झाली आहे. एकूण संघांचा या निवडीमध्ये समावेश असून, जिल्हास्तरीय फेरीत उत्कृष्ट सादरीकरण करून विद्यार्थ्यांनी पुढील फेरीत स्थान मिळवले आहे.

विद्यार्थ्यांनी आरोग्य, पर्यावरण, सामाजिक प्रश्न आणि तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांतील समस्यांवर आधारित संशोधन प्रकल्प सादर केले. या प्रकल्पांमधून विद्यार्थ्यांची संशोधनवृत्ती, चिकित्सक विचारसरणी, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नाविन्यपूर्ण संकल्पना मांडण्याची क्षमता अधोरेखित झाली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे महाविद्यालयातील संशोधनपूरक शैक्षणिक वातावरण आणि नवोपक्रमांना दिले जाणारे प्रोत्साहन पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

यात पदव्युत्तर पदवी स्तरात विशाल बागुल, संजना चोरडिया, कल्याणी बिरारी, सुष्मिता पाटील, शोहेब मान्यार तसेच पदव्युत्तर स्तरात विशाखा मोरे, अक्षदा दातीर, अवनी भावसार, सृष्टी वराडे, उन्नती चौधरी, वाल्मीक बाविस्कर, रोशन ढाडीवाल, आदित्य जाधव, आयुषी पेठे, भटुलाल बोरसे आणि पदवी स्तरात तेजस बागल, दिव्या बेलदार, जान्हवी नेरकर, महेश नांद्रे, रेणुका भाले, रेणुका भावसार, गौरव भंडारे, लक्ष्मी जांगीड, रितेश पाटील, वैष्णवी बडगुजर, अदिती दायमा, शीला नाईक, प्रियंका जाधव, हरीश बोरसे, वैभव महाजन, उदय कांबळे, ईशा कुवर, जान्हवी सपकाळे, अनुप धनगर, गौरी चौधरी या विद्यार्थ्यांची विद्यापीठ स्तरीय आविष्कार स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल, सर्व संचालक, प्राचार्य डॉ. एस. बी. बारी यांनी समाधान व्यक्त केले. तसेच आगामी विद्यापीठस्तरीय स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातील लौकिकात भर घालावी, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.

या यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक डॉ. पी. ओ. पाटील, डॉ. एल. आर. झंवर, डॉ. जी. बी. पाटील, डॉ. व्ही. के. चटप, डॉ. आर. ई. मुथा, डॉ. जमीर खान, डॉ. प्रशांत पाटील डॉ. आर. एस. ताडे, प्रा. विशाल बागुल, डॉ. डी. एम. पाटील, प्रा. शोहेब मान्यार, प्रा. कोमल भोई यांचे मार्गदर्शन लाभले.

सदर अविष्कार स्पर्धेचे समन्वयक डॉ. आर. एस. ताडे व प्रा. एस. के. आमले यांनी काम पहिले.

अध्यादेशातून गोकुळवर कब्जा

कोल्हापूर जिल्हा दूध महासंघ म्हणजेच गोकुळ या दूध महासंघावर वाट्टेल ते करून कब्जा मिळवायचा, हे महायुती सरकारने ठरवलेलेच होते. राज्याची सत्ता आहेच. जिल्हा परिषदा, स्थानिक स्वराज्य संस्था, महापालिका, नगर परिषदांची सर्वाधिक सत्ता आज भाजपाकडे आहे. केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्यासारखे काही मोजके वगळले तर सहकार क्षेत्रात भाजपाचे नाव शोधावे लागते. मात्र आलेल्या नोटीसांना घाबरून महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील अनेक दिग्गज भाजपामधे गेले आहेत व सत्तेच्या पदांवर नांदत आहेत. भाजपामधे आलेले बहुतेक काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील आहेत. याच नेत्यांच्या खांद्यावर बंदुक ठेऊन आता भाजपा सहकार क्षेत्रात शिरकाव करीत आहे.

गोकुळवर महायुतीला कब्जा पाहिजे कारण ही संमृध्द दूध संस्था गुजरातच्या अमूलमधे विलीन करण्यासाठी ,,, असा जोरदार प्रचार झाला. महाराष्ट्राची महानंद ही सहकारी दूध संकलन शिखर संस्था एनडीडीबी (राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ) च्या ताब्यात कोणी दिली ? महानंद डबघाईला कोणी आणली ? तिथे तज्ञ व अभ्यासुंच्या नेमणुका करून महानंदला सधन बनविण्याचे का प्रयत्न झाले नाहीत ? शेवटी महानंद मुंबईतील मौल्यवान जागेसह केंद्र सरकारच्या उपक्रमाला अर्पण केली गेली. त्यावरचे महाराष्ट्राचे, मराठी लोकांचे नियंत्रण संपुष्टात आले. तसेच उद्या गोकुळचेही हेच होण्याची भिती आहे. कोल्हापूच्या मातीत दुधाचा महापूर योजनेत १९७० साली उभारलेला दूध संघ आता मोठा वटवृक्ष झाला आहे. गोकुळचे रोजचे दूध संकलन सोळा ते सतरा लाख लिटर्स आहे. साडे पाच लाख दूध उत्पादक सदस्य आहेत. ४ हजार १८५ कोटी वार्षिक उलाढाल आहे. कोल्हापूरचे दोन लोकसभा मतदारसंघ व दहा विधानसभा मतदारसंघात गोकुळचा प्रभाव आहे. जिल्ह्याचे राजकीय व आर्थिक गणित गोकुळवर अवलंबून आहे. गोकुळमधील अनेक माजी कारभारी भाजपामधे आहेत. मंत्री हसन मुश्रीफ व महाडिक यांची नावे सातत्याने घेतली जात आहेत.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचे त्यांना आशीर्वाद आहेत. तरीही काँग्रेसचे माजी मंत्री व आमदार सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या नेतृत्वाखालील पनेलला सर्वाधिक जागा मिळाल्या. पंचवीस जागांसाठी झालेल्या निवडणुकीत सतेज पाटील यांच्या समविचारी पॅनेलला १३ तर महायुतीच्या पॅनेलला १२ जागा मिळाल्या. बैठकीसाठी मात्र चौदा जणांची उपस्थिती हवी असा नियम आहे. इथेच मोठी गोची झाली. २९ ऑक्टोबरला अध्यक्षपदाची निवडणूक ठरली पण महायुतीचे बारा जण फिरकलेच नाहीत. ते कुठे गेले होते, गैरहजर का राहिले, असा प्रश्न कोणी मुख्यमंत्र्यांना किंवा कोल्हापूरच्या पालकमंत्र्यांना विचारला नाही. बैठकीला आवश्यक ती उपस्थिती नसल्याने निवडणूक होणार कशी ? मग सरकारनेच नियमात बदल करून गोकुळ दूध महासंघावर पाच संचालक नेमण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी घाईघाईने अध्यादेशही काढला.राज्यपालांनीही त्यावर स्वाक्षरी केली. शासकीय नियुक्त पाच पैकी चार संचालकांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. महायुतीचा गोकुळमधे पराभव झालाच. पण काँग्रेसप्रणित पनेलचा एकही उमेदवार निवडून येणार नाही, असे सरकारमधील मंत्रीच माध्यमांना मुलाखती देताना वारंवार सांगत होते. प्रत्यक्षात महायुतीला साधे बहुमतही गाठता आले नाही. दूध उत्पादन शेतकरी सदस्यांनी महायुतीला नाकारले. पण खुल्या मनाने पराभव पत्करण्याची भाजपाची तयारी नव्हती. सतेज पाटील यांच्या पनेलचा चेअरमन होता कामा नये अशी खेळी खेळली गेली. नियमात बदल करून प्रशासकीय ताकदीवर गोकुळ दूध संघ ताब्यात घेण्यात आला. पण त्यातून सरकारच्या निर्णयाची जास्त बदनामीच झाली. सोशल मिडियावर महायुती सरकारवर टीकेची झोड उठली. एका दूध संघावर सत्ता मिळविण्यासाठी महायुती सरकार कसा आटापीटा करते हेच सर्व महाराष्ट्राला दिसले. शासकीय नियुक्त चार संचालकांना मतदानाचा अधिकार दिला की गोकुळ दूध संघावर महायुतीचे बारा अधिक चार असे सोळा सदस्य असतील, महायुतीला बहुमत प्राप्त होईल हाच त्यामागे सरकारचा हेतू असावा. गोकुळ दूध संघावर पुन्हा निवडणूक घेण्याची पाळी येऊ नये म्हणून पाच शासकीय संचालक नेमण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे असे स्वत: मुख्यमंत्र्यांनीच म्हटले. गोकुळची किती काळजी आपल्याला आहे हे त्यातून ते दाखवत होते. प्रत्यक्षात बहुमत मिळविलेल्या सतेज पाटलांना गोकुळची सत्ता मिळू नये यासाठी हा सर्व खटाटोप होता, हे सर्व जनतेला कळून चुकले.

लोकसभेतील विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी एक्सवर, जनादेशात भेसळ व मतांची चोरी असे गोकुळमधील निकालानंतर भाष्य केल्याने भाजपा आक्रमक झाली. एका जिल्हा दूध संघात लक्ष घालण्याचे कारण काय, असा प्रश्न भाजपाने राहुल गांधींना विचारला. सत्ता टिकविण्यासाठी इंदिरा गांधींनी आणीबाणी लादून दोन वर्षे देशातील विरोधी पक्षाला तुरूंगात डांबले होते, त्या काँग्रेस पक्षाने लोकशाहीच्या गप्पा मारू नयेत, असा टोला भाजपाने लगावला आहे. त्यातच सर्वोच्च न्यायालयचे निवृत्त सरन्यायाधिश भूषण गवई यांनी शासन नियुक्त संचालकांना मतदानाचा अधिकार दिल्यास ते बेकायदेशीर ठरेल व न्यायालयात सरकारचा अध्यादेश टिकू शकणार नाही अशी स्पष्ट भूमिका मांडली. गोकुळ वाचविण्यासाठी आम्ही सर्व ताकदीनिशी आपल्या पाठिशी उभे आहोत, असे उबाठा सेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सतेज पाटील यांना फोन करून सांगितले आहे. मनसेचे सर्वेसर्वा राज ठाकरे यांनी तर महायुती सरकारचा रडीचा डाव अशी टीका केली आहे.

आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे, महायुतीला गोकुळच्या निकालानंतर विजय साजरा करता आला नाही. त्यांचा अहंकार दुखावला गेला. अध्यादेशातून सत्ता काबीज करणे म्हणजे विनाशकाले विपरित बुध्दी शासकीय सदस्य नेमून सरकारने जनमताचा अनादर केला आहे. उद्या लोकसभा निवडणुकीत हाच रडीचा डाव ते खेळतील माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणतात- उत्कृष्ट चाललेल्या आर्थिक संस्थावर कब्जा करण्याचा हा डाव आहे. निवडून आलेल्या लोकांचे अधिकार काढून घ्यायचे व आपल्या विचाराची माणसे बसवून जबरदस्तीने कब्जा घ्यायचा. सत्ता हातात ठेवण्यासाठी देशातील तेरा कोटी मतदारांना वगळले हा त्यातलाच प्रकार आहे.. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीत सरकारच्या मंत्र्यांनाच पोलिसांनी केलेली मारहाण, ही सर्व हुकूमशाही वृत्ती आहे.

सतेज पाटलांकडे बहुमत असेल तर त्यांनी त्यांचा चेअरमन गोकुळवर आणून दाखवावा, असे आव्हान मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले आहे. महायुतीतील मित्र पक्ष असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची साथ मात्र सरकारला नाही, हे एक आश्चर्यच म्हणावे लागेल. गोकुळवर शासकीय सदस्य नेमण्याच्या सरकारच्या निर्णयाला शिवसेनेचे आमदार बच्चू कडू व पुण्याचे रवींद्र धंगेकर यांनी विरोध दर्शवला आहे. गोकुळच्या नावाने चिटींग थांबवा असा घरचा आहेर धंगेकरांनी महायुती सरकारला दिला आहे. शासकीय सदस्य नेमणार होतात, मग निवडणूक घेतलीच कशाला ? असा प्रश्न बच्चू कडूंनी सरकारला विचारला आहे. कोल्हापुरचा झणझणीत तांबडा रस्सा तुमच्या धमन्यातून वाहू द्या, अध्यादेश काढणाऱ्यांचे डोळे पांढरे करू या, इथंपासून ते पुढच्या दिवाळीत गोकूळ ऐवजी अमूल दूध पिण्यासाठी शुभेच्छा .. अशा संतप्त व खिल्ली उडविणाऱ्या पोस्ट सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत.

स्टेटलाइन -
डॉ.सुकृत खांडेकर
मो.नं.९५९४२२४०००

सिद्धेश्वर गुड मॉर्निंग कष्टकऱ्यांना फराळ

धुळे, दि. ८ (प्रतिनिधी) : दिवाळीचा सण सर्वांसोबत आनंदाने साजरा व्हावा, या उदात्त हेतूने येथील श्री.सिद्धेश्वर गुड मॉर्निंग ग्रुपच्यावतीने दिवाळीनिमित्त फराळाचे वाटप करण्यात आले. बापूसाहेब महाजन यांच्या वतीने व्यावसायिकांना फराळ देण्यात आला. या उपक्रमा वेळी ग्रुपचे सर्व सदस्य उपस्थित होते. दिवाळीनिमित्त छोट्या व्यावसायिकांना फराळाचे वाटप करण्यात आले.

आण्णांनी मिळवून दिलेले लोककल्याणकारी कायदे जनतेपर्यंत पोहोचवा- अशोकराव सब्बनांचे आवाहन

शहादा, दि.८ (प्रतिनिधी) - सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांनी उपोषण आणि आंदोलनांच्या माध्यमातून मिळवून दिलेले लोककल्याणकारी कायदे जनतेपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. यासाठी संघटितपणे आणि नियोजनपूर्वक संघर्ष करावा लागेल. असे प्रतिपादन राष्ट्रीय लोक आंदोलन न्यासाचे सचिव अशोकराव सब्बन यांनी केले.



पद्मभूषण अण्णा हजारे प्रणीत राष्ट्रीय लोक आंदोलन न्यास, राळेगणसिद्धी यांच्या नंदुरबार जिल्हा कार्यकारिणीतर्फे श्रीक्षेत्र दक्षिण काशी प्रकाशा येथील संत दगडूजी महाराज सभागृहात संघटन बांधणी व कार्यकर्ता मार्गदर्शन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. न्यासाच्या कार्याध्यक्षा कल्पनाताई इनामदार यांनी बैठकीचे अध्यक्षपद भुषवले.

यावेळी अशोकराव सब्बन म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानामुळे नागरिकांना अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि लोकशाही व्यवस्थेत सहभागी होण्याचा अधिकार मिळाला आहे. मात्र, शासनाच्या कामकाजावर लक्ष ठेवण्यासाठी आणि प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी आवश्यक असलेले अधिकार प्रत्यक्षात वापरण्यासाठी नागरिकांनी संबंधित कायद्यांची माहिती करून घेणे गरजेचे आहे. अण्णा हजारे यांच्या आंदोलनांमुळे माहितीचा अधिकारासारखे महत्त्वाचे कायदे प्रभावीपणे जनतेसमोर आले. शासनाच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी या कायद्याची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

यावेळी राष्ट्रीय लोक आंदोलन न्यासाच्या कार्याध्यक्षा कल्पनाइनामदार यांनी राज्य सरकारकडून विविध कायद्यांमध्ये करण्यात येणाऱ्या बदलांवर टीका केली. त्यांच्या म्हणण्यानुसार, राज्य सरकारने सुमारे ११५ पेक्षा अधिक कायद्यांमध्ये बदल केले आहेत. कायद्यांमध्ये बदल करताना जनहित, पारदर्शकता आणि संविधानातील मूलभूत मूल्यांचा विचार होणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय लोक आंदोलन न्यासाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी प्रत्येक गावात प्रामाणिक व सक्रिय कार्यकर्ता तयार करणे आवश्यक आहे. असे आवाहन केले.

या बैठकीच्या प्रारंभी नंदुरबार जिल्हाध्यक्ष एकनाथ गिरधर पाटील यांनी प्रास्ताविकातून न्यासाच्या कार्याचा आढावा घेतला. दरम्यान शहादा नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजित पाटील, नंदुरबार जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रामचंद्र दशरथ पाटील, श्री संत दगाजी महाराज संस्थानचे अध्यक्ष मोहन काशिनाथ चौधरी यांनीही सदिच्छा भेट दिली.

या बैठकीस न्यासाचे राळेगणसिद्धी कार्यालय प्रतिनिधी अन्सार शेख, प्रसन्नकुमार बंब, गिरिधर मोरे, सौ. सुनीता अंबालाल पाटील, सौ.शैला योगेश पाटील, सौ.माधुरी अंबालाल पाटील, डॉ.सतिश पाटील, पंढरीनाथ पुनाजी पाटील, के डी गिरासे, प्रा.उत्तम वेडू निळे, विवेक भास्कर पाटील, विनोद दिलवरसिंग माळी, महेश कुमार रामनानी, अनिल उद्धव जावरे, भरत गोरख पाटील, बबनराव पाडवी, फेंदा पावरा, मुरार पाटील, शाकीर इसाणी, सुरेश पाटील, शशिकांत पाटील, प्रकाश लक्ष्मण पाटील, रामकृष्ण पाटील, धरमसिंग ठाकरे, डॉ.अनिल साळुंखे, केवजी गावीत, विजय नरोत्तम पाटील, प्रदीप साळवेसर, गंगाराम वसावे, हेमंत परदेशी, जगन ठाकरे, विपुल रोकडे, फरीदखान पठाण, दिनेश नेरपगार, विनोद रावण पाटील यांच्यासह विविध तालुक्यांतील सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.उत्तम वेडू निळे यांनी केले, तर आभार के.डी.गिरासे यांनी मानले.

पटेल इंग्लिश मीडियममध्ये दिवाळी स्नेहमिलन संपन्न

शिरपूर, दि.८- तालुक्यातील वरूळ येथील आर. सी. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये आजी-आजोबा दिन आणि दिवाळी सक्रेहमिलनाचा सोहळा उत्साहात पार पडला. प्रेम, आपुलकी, आठवणी, मनोरंजन आणि सांस्कृतिक सादरीकरणांनी सजलेल्या या कार्यक्रमातून तीन पिढ्यांमधील भावनिक नात्यांचे सुंदर दर्शन घडले.

कार्यक्रमाला जवखेडा येथील सरपंच हिराबाई ठाकरे उपस्थित होत्या. समन्वयक भारती सोनवणे, मुख्याध्यापिका सपना मराठे, पालक उपस्थित होते.मुख्याध्यापिका सपना मराठे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची संकल्पना आणि त्यामागील उद्देश स्पष्ट केला. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागतगीताने सुरुवात झाली. चिमुकल्यांच्या सुरेल सादरीकरणाने उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. या स्वागतगीतासाठी हंसराज कोळी यांचे मार्गदर्शन लाभले. वरिष्ठ बालवाडीच्या विद्यार्थ्यांनी आकर्षक स्वागतनृत्य सादर करून कार्यक्रमात उत्साहाची भर घातली. बालवयातील निरागसता आणि नृत्यातील उत्स्फूर्तता यामुळे उपस्थितांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या नृत्याचे नृत्यदिग्दर्शन श्यामकांत पवार यांनी केले.

ज्येष्ठांसाठी विविध मनोरंजक खेळ घेण्यात आले. आजोबांसाठी दिवाळीशी निगडित कापसाच्या वाती बनविण्याचा खेळ आयोजित करण्यात आला. या खेळाचे आयोजन सौ. मनीषा बोरसे यांनी केले. नातवंडांच्या मनातील आजी-आजोबांविषयीचे प्रेम आणि त्यांच्या जीवनातील ज्येष्ठांचे महत्त्व स्पष्ट करणारे तिसरीच्या विद्यार्थ्यांचे नाट्य विशेष लक्षवेधी ठरले. या सादरीकरणासाठी गायत्री शिंदे यांनी मार्गदर्शन केले. आजी-आजोबांसाठी आयोजित जोडप्यांच्या खेळाचे आयोजन अश्विन पवार यांनी केले.

मूलभूत सोयीसुविधांसाठी पाच को. मंजूर- आ.राम भदाणेंची माहिती



धुळे, दि.८- धुळे ग्रामीण मतदारसंघातील व धुळे उपनगरांतील मूलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार राम भदाणे यांनी दिली. राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने याबाबतचा शासन निर्णय नुकताच जारी केला आहे.

धुळे मतदारसंघातील व धुळे शहरातील उपनगर व कॉलनीनिहाय मंजूर कामे व निधी पुढीलप्रमाणे : धुळे महानगरपालिका क्षेत्रातील चितोड येथे महानगरपालिकेचे सभामंडप बांधणे ३० लाख, बोरसे नगर ओपन स्पेस येथे सभामंडप बांधणे ३० लाख, राजाराम नगर येथे सभामंडप करणे ३० लाख, मोराणे प्र. ल. येथे गावांतर्गत सभामंडप बांधणे ३० लाख, भिवसन नगर ओपन स्पेस येथे सभामंडप बांधणे ५० लाख, राजेंद्र नगर येथे सभामंडप बांधणे ३० लाख, नकाणे येथे गावांतर्गत सभामंडप बांधणे ५० लाख, वरखेडे गावांतर्गत सभागृह / व्यायामशाळा बांधणे ५० लाख, धनदाई नगर, गोंदूर रोड येथे सभामंडप बांधणे ३० लाख, बिजली नगर/गोंदूर रोड ओपन स्पेस येथे सभामंडप बांधणे ३५ लाख, औदुंबर सोसायटी येथील ओपन स्पेस येथे सभामंडप बांधणे ३० लाख, विद्युत प्रभा कॉलनी, भूमिका लॉण्ड्री जवळ ओपन स्पेस येथे सभामंडप करणे ३० लाख, बाळापूर येथे गावांतर्गत सभामंडप बांधणे ३० लाख, महिंदळे येथे गावांतर्गत सभामंडप करणे २० लाख, तर अनिरुद्ध नगर येथे सभामंडप बांधणे २५ लाख, अशा एकूण १५ कामांसाठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या निधीतून धुळे महानगरपालिका क्षेत्रातील व त्याला लागून असलेल्या उपनगरांतील गावांमध्ये सभामंडप, सभागृह, व्यायामशाळा यांसारख्या सार्वजनिक सुविधांची कामे केली जाणार आहेत. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली कामे या निधीमुळे मार्गी लागणार असल्याचे आमदार भदाणे यांनी सांगितले.

स्वामी नारायण मंदिरात शारदा पूजन संपन्न

धुळे, दि.८- देवपूर परिसरातील बी ए पी एस स्वामी नारायण मंदिरात दिवाळी लक्ष्मी पूजनाच्या दिवशी प्रमुख कोठारी आनंदजीवन स्वामी यांच्यासह संत गणांच्या उपस्थितीत सुमारे १०५ चोपडी अर्थातच वही पूजन झाले.

यावेळी शहरातील व्यापारी तसेच उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संतांनी व्यापारी तसेच उपस्थित भाविकांना आर्शिवाद देत दिवाळी तसेच गुजराती नव वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. दिवाळी निमित्त भगवान स्वामी नारायण यांच्या गाभारा समोर युवती मंडळ वतीने आकर्षक अशी फुलांची रांगोळी रेखाटण्यात आली. तसेच दिवाळी निमित्ताने मंदिर तसेच परिसरात विद्युत रोषणाईने परिसर उजळून निघाला होता.

शिंदखेड्यात कष्टकऱ्यांना फराळ देत वानखेडे कुटुंबाने दिवाळी केली गोड



धुळे, दि. ८ (प्रतिनिधी) : शिंदखेडा नगरपंचायतीच्या स्वच्छता आणि पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांची दिवाळी फराळ आणि भेटवस्तू देत गोड करण्यात आली. शिंदखेडा नगरपंचायतीतील माजी गटनेते अनिल वानखेडे आणि माजी लोकनियुक्त नगराध्यक्षा रजनी वानखेडे यांच्या वतीने नगरपंचायतीच्या साठपेक्षा अधिक महिला-पुरुष कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त फराळ, मिठाई आणि भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. त्यामुळे कष्टकऱ्यांची दिवाळी आनंदी ठरली.

शिंदखेड्यातील वानखेडे कुटुंबियांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही फराळ वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. शिंदखेडा नगरपंचायतीमध्ये शहर स्वच्छता, कचरा संकलन आणि पाणीपुरवठा यांसारख्या महत्त्वाच्या विभागांमध्ये सुमारे साठपेक्षा अधिक कर्मचारी अहोरात्र सेवा बजावत असतात. शहर स्वच्छ, सुंदर आणि नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात या कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या कष्टांची दखल घेत त्यांच्या घरातही दिवाळीचा आनंद पोहोचावा, या भावनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे नगरपंचायतीतील महिला-पुरुष कर्मचाऱ्यांसह मुस्लिम कर्मचाऱ्यांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. जात, धर्म आणि पंथाच्या पलीकडे जाऊन सर्वांनी एकत्रितपणे दिवाळीचा आनंद साजरा केला. अनिल वानखेडे यांच्या हस्ते फराळ आणि भेटवस्तू स्विकारताना कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. सणाच्या काळात मिळालेल्या या सक्रेहभेटीबद्दल कर्मचाऱ्यांनी वानखेडे कुटुंबियांचे आभार मानले.

यावेळी अनिल वानखेडे यांनी कर्मचाऱ्यांचे आरोग्य निरोगी राहो, त्यांच्या कुटुंबात सुख, शांती आणि समृद्धी नांदो, अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

होळनांथे येथे क्रीडा संमेलन उत्साहात संपन्न

शिरपूर, दि.८- तालुक्यातील होळनांथे येथील आर. सी. पटेल सीबीएसई इंग्लिश मीडियम स्कूल येथे वार्षिक क्रीडा संमेलन आरोहण २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

यंदाच्या क्रीडा महोत्सवाची संकल्पना ग्रीनोव्हेशन एव्हरी स्टेप काउंट्स, एव्हरी ट्री मॅटर्स अशी होती. क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून शिस्त, एकता, संघभावना आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे दिला. विद्यार्थ्यांसह पालकांनीही विविध स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व स्वागतगीताने झाली. क्रीडा ज्योत प्रज्वलित करून आणि फुगे आकाशात सोडून आरोहण चे उद्घाटन शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या सचिव सौ. रेषा पटेल, विश्वस्त अतुल भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले.

या सोहळ्यास वाघाडीच्या प्राचार्या मेघा मुंगसे, अमरिशभाई आर. पटेल स्कूलच्या प्राचार्या स्मिता उगले प्रमुख अतिथी म्हणून तसेच शाळेच्या प्राचार्या सौ. भूमिका गर्ग उपस्थित होते. क्रीडा कॅप्टन नम्रता आर. हिने सर्व खेळाडूंना क्रीडा शपथ दिली. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध मार्च पास्ट आणि चार हाऊसेसच्या आकर्षक ड्रिलने उपस्थितांची मने जिंकली.

एकाच छता खाली दिवाळी अंक

एकाच छताखाली राज्यातील नामवंत दिवाळी अंक अल्प खर्चात उपलब्ध. धुळे जिल्ह्यातील १७२ वर्षाची परंपरा असणाऱ्या धोंडो शामराव गरुड जिल्हा वाचनालय, जेलरोड धुळे आपल्या सेवेसाठी दिवाणी अंकाची मेजवानी दिनांक ७ नोव्हेंबर २०२६ पासून आणत आहे.

दिवाळी अगोदर वर्गणी भरणाऱ्यांना २०० रु. दिवाळीत म्हणजेच दिनांक ७ नोव्हेंबर नंतर वर्गणीदार होणाऱ्यांना २५० रुपये लागतील.

ही वर्गणी सलग चार महिन्यासाठी असल्याने वाचकांना मोठा लाभ होणार आहे.

टिप : वाढत्या महागाईमुळे दिवाळी अंकाच्या किंमती गगनास भिडल्या असल्याने सर्वांनी वाचनालयाने सुरु केलेल्या योजनेचा लाभ घ्यावा.

धों. शा. गरुड जिल्हा वाचनालय, जेलरोड, धुळे

NAME CHANGE
MY PREVIOUS NAME WAS
HAMID ISMAIL SHEKH
AND MY NEW NAME IS
HAMIDA ESMAIL SHEKH
ADD- GHAR NO 6 SAKRI ROAD MOGLAI SANTOSH WAGH CHAUK, DHULE-424001. (M.S.)

NAME CHANGE
MY PREVIOUS NAME WAS
ANSARI SHAKEEL AHMED ABDUL MAJID
AND MY NEW NAME IS
SHAKEEL AHMED ABDUL MAJEED
ADD- VADJAI ROAD BEHIND GAFUR NAGAR MASJID GAFUR NAGAR, DHULE-424001. (M.S.)

NAME CHANGE
MY PREVIOUS NAME WAS
SHAHENAZ PARVIN SHAKEEL AHMED ANSARI
AND MY NEW NAME IS
SHAHNAZ PARVIN SHAKEEL AHMED
ADD- VADJAI ROAD BEHIND GAFUR NAGAR MASJID GAFUR NAGAR, DHULE-424001. (M.S.)

NAME CHANGE
MY OLD NAME WAS
NAZ PARVEEN MANSOOR SHAIKH
MY NEW NAME IS
NAAZ PARVEEN JAHIKODDIN SHAIKH
ADD- B.NO.9/50A, CHALISGAON ROAD, HAZAR KHOLI, NEAR SARVAJANIK HOSPITAL, DHULE-424001.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे येथील स. नं. ४५० पैकी प्लॉट नं. २८, चे क्षेत्र ५९५० चौ. फुट यापैकी पश्चिमेकडील भागाचे क्षेत्र ३९१० चौ. फुट ३६३.४१ चौ. मी. यास फायनल प्लॉट नं. ७३ पैकी प्लॉट नं. २८ चे क्षेत्र ५९५० चौ. फुट यापैकी पश्चिमेकडील भागाचे क्षेत्र ३९१० चौ. फुट, ३६३.४१ चौ. मी. बखळ प्लॉट त्याची चतु:सिमा नकाशा रेकॉर्डप्रमाणे मिळकतीचे मालक श्री. समीर इब्राहीम शेख रा. आयशा पार्क, वडाला रोड, हिरवे नगर, नाशिक मिळकतीच्या मालकांनी सदर मिळकत ही त्यांचे मालकी हक्कात व कब्जात आहे. असे सांगून त्याबाबत तपासणी करण्याकरीता आम्हाला सूचना दिलेल्या आहे. म्हणून त्याचे सांगण्यावरुन प्रस्तुतची टायटल व्हेरिफिकेशन ची नोटीस देण्यात येते की,

तरी सर्वांना या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, सदर मिळकत संबंधी कोणाचाही कुठल्याही प्रकारे सौदा पावती, हक्क, हित, सबंध देणे घेणे, मालकी हक्क, भाडेपट्टा, व लीज, ताबा, गहाण, दान, बोजा, कर्ज, लीज, टाच वा वारस हक्क, खावटी दृ म. जु. वगैरे कोणत्याही व कुठल्याही प्रकारे हक्क व अधिकार असल्यास सदर नाटीस जाहीर झाल्याचे १० (दहा) दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री प्रती सहीत आमचे ऑफिसात हरकती सादर कराव्यात. परस्पर जाहीर नोटीस वर्तमानपत्रावर असल्यास त्या ग्राह्य धरण्यात येणार नाही व हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजण्यात येईल व आमचे पक्षकार सदर मिळकत तबदिल करण्यास मुक्त राहतील. त्यानंतर आलेल्या हरकती ह्या ग्राह्य धरल्या जाणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.. धुळे दि. ०६/११/२०२६

**ॲड.पर

पान १ वरुन

देशातील सशस्त्र नक्षलवाद आता संपला असून

नागरिकांना घराबाहेर पडणेही कठीण व्हायचे. नक्षलवाद्यांकडून नागरिकांचा मतदानाचा अधिकारही हिरावून घेतला जात होता. बिहार, महाराष्ट्र, ओडिशा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडसह देशातील अनेक भागांना डाव्या विचारसरणीच्या उग्रवादाचा सामना करावा लागला. हजारो गावे आणि कोट्यवधी नागरिकांना नक्षली हिंसाचाराचा फटका बसल्याचे त्यांनी नमूद केले.

भूमी वीरांच्या रक्ताने पावन

यापुर्वी २०१० मध्ये याच परिसरातील दंतेवाडा येथे नक्षलवाद्यांसोबत झालेल्या चकमकीत सीआरपीएफचे ७६ जवान शहीद झाले होते. त्याच वर्षी दंतेवाडा परिसरात झालेल्या अन्य एका घटनेत ४४ निष्पाप नागरिकांची हत्या करण्यात आली होती. या घटनांचा उल्लेख करत पंतप्रधान म्हणाले की, ही भूमी आपल्या वीरांच्या रक्ताने पावन झाली आहे. यावेळी त्यांनी तत्कालीन परिस्थितीवरून विरोधकांवर टीका केली. नक्षलवादी हिंसाचारातील बळींबाबत काही राजकीय नेत्यांनी पुरेशी संवेदनशीलता दाखवली नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

वैचारिक नक्षलवाद्यांची घुसखोरी?

जवानांना संबोधित करताना पंतप्रधान मोदी यांनी वैचारिक नक्षलवादाचा मुद्दा उपस्थित केला. जंगलांमधील सशस्त्र नक्षलवाद्यांचा प्रभाव कमी झाला असला, तरी काही संघटनांवर वैचारिक नक्षलवाद्यांनी कब्जा केल्याचा आरोप त्यांनी केला. अशा प्रवृत्तींकडून देशाचे संविधान आणि लोकशाही यांच्याविरोधात लोकांना भडकविण्याचे काम केले जात असल्याचे ते म्हणाले. अनेक राजकीय पक्ष आणि संघटनांमध्येही अशा विचारसरणीच्या लोकांनी घुसखोरी केल्याचा दावा त्यांनी केला. त्यांना ओळखून त्यांचा वैचारिक पातळीवर मुकाबला करणे आणि देशाची सुरक्षा अधिक मजबूत ठेवणे आवश्यक असल्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी जवानांना केले.

सुरक्षेचा मुद्दा मांडल्याने सूडबुद्धीने कारवाई: सोनम

हिरावून घेतले जात असल्याचा आरोप वांगचुक यांनी पत्रातून केला आहे. प्रशासनाच्या कारभारावर प्रश्न उपस्थित करताना त्यांनी नागरिकांच्या अभिव्यक्तीस्वातंत्र्याबाबतही चिंता व्यक्त केली आहे. वांगचुक यांनी आरोप केला की, लडाखमध्ये सोशल मीडियावर एखादी छोटी टिप्पणी करणे किंवा एखादी पोस्ट केवळ लाईक करणे यावरूनही नागरिकांविरोधात थेट एफआयआर दाखल करून त्यांना अटक केली जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

यापुर्वी १४ ऑक्टोबरला लडाख लेन्स-१ आणि लडाख व्हिजन-१ या नावांची दोन सोशल मीडिया पेज तयार करण्यात आल्याचेही वांगचुक यांनी पत्रात नमूद केले आहे. यातील लडाख लेन्स-१ या पेजचा वापर आपली प्रतिमा मलिन करण्यासाठी आणि बिनबुडाचे आरोप करण्यासाठी केला जात असल्याचा त्यांचा दावा आहे. तर लडाख व्हिजन-१ या पेजच्या माध्यमातून नायब राज्यपाल प्रशासनाच्या कामांची खोटी प्रसिद्धी केली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. लडाख मधील स्थानिकांचे अधिकार, सीमावर्ती भागांची सुरक्षा आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य या महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी मागणी वांगचुक यांनी केली आहे. राष्ट्रपतींनी या प्रकरणात हस्तक्षेप करून संबंधित बाबींची दखल घ्यावी, अशी विनंतीही त्यांनी पत्राद्वारे केली आहे.

शेतकरी कुटुंबासोबत मुख्यमंत्र्यांनी दिवाळी

उन्हात पिकांची पाहणी

आज (रविवारी) सकाळी मुख्यमंत्र्यांनी परिसरातील सिंचन प्रकल्पांना भेटी दिल्या. त्यानंतर सोनेगाव रिठी येथील शेतकरी दिलीप सरोदे यांच्या शेतात जाऊन पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. दुष्काळी परिस्थितीमुळे पिकांवर निर्माण झालेला परिणाम आणि सिंचनाच्या समस्यांबाबतही चर्चा केली.

विंधन विहिरींची बंदी शिथिल

दुष्काळी परिस्थिती आणि वाढत्या जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर शेतीसाठी विंधन विहिरी खोदण्यावरील बंदी १५ डिसेंबरपर्यंत शिथिल करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. लोहारी सावंगा येथे तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींच्या सरपंचांशी आणि लोकप्रतिनिधींशी संवाद साधताना त्यांनी हा निर्णय जाहीर केला. यंदा पाण्याच्या कमतरतेमुळे पिके धोक्यात येण्याची शक्यता आहे. विंधन विहिरींच्या खोलीकरणासह नवीन विहिरी खोदण्यास परवानगी देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली होती.

यावर मुख्यमंत्री म्हणाले की, विंधन विहिरींचे खोलीकरण किंवा नवीन विंधन विहिरी करण्यावरील बंदी उठविणे सरकारसाठी काहीसे अडचणीचे आहे. तरी विशेषबाब म्हणून हा निर्णय घेण्यात येत आहे. मात्र, यासाठी संबंधित शेतकऱ्यांना परवानगी घेणे आवश्यक राहणार आहे. हा निर्णय सरसकट लागू नसून फळबागा जगविण्यासाठी आणि आवश्यक असलेल्या ठिकाणीच परवानगी दिली जाईल, असे स्पष्ट केले. दिवाळीच्या निमित्ताने शेतकरी कुटुंबात मुक्काम, शेतातील पिकांची पाहणी आणि दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजनांसाठी घेतलेला निर्णय यामुळे लोहारी सावंगा येथील मुख्यमंत्र्यांचा दौरा चर्चेचा विषय ठरला आहे.

गुलाबी थंडीची चाहूल पहाटे गारवा वाढला

उच्चांकी ३७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. याशिवाय सांताक्रूझ, अमरावती, डहाणू, सोलापूर, जळगाव, धुळे, अहिल्यानगर, अकोला, चंद्रपूर आणि वर्धा या भागांतही तापमान ३५ ते ३६ अंशांच्या पुढे गेल्याने दिवसा उन्हाचा जोर कायम आहे.

तापमानात घट; पहाटे गारवा

दुसरीकडे, राज्याच्या किमान तापमानात हळूहळू घट होत आहे. पहाटेच्या वेळी थंडीचा अनुभव येत आहे. नाशिक जिल्ह्यातील निफाड येथील गहू संशोधन केंद्रात राज्यातील नीचांकी १२.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. त्यामुळे सकाळी घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांना थंडगार वातावरणाचा अनुभव येत आहे.

चक्राकार वाऱ्यांचा परिणाम

अरबी समुद्रात दक्षिण केरळच्या किनारपट्टीलगत चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली आहे. याचा परिणाम राज्यातील हवामानावर होत असून, तापमानात चढ-उतार पाहायला मिळत आहेत. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ८ नोव्हेंबर रोजी राज्यातील अनेक भागांत तापमानातील हा लपंडाव कायम राहण्याची शक्यता आहे. एकीकडे पहाटेचा गारवा आणि दुसरीकडे दुपारचे कडक ऊन अशा बदलत्या वातावरणामुळे राज्यात गुलाबी थंडीची चाहूल लागली असली, तरी नागरिकांना आणखी काही दिवस थंडीची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

लक्ष्मीपूजन निमित्त बाजारपेठेत गर्दी

बाजारपेठेत पन्नास रूपये किलो दराने झेंडूच्या फुलांची विक्री झाली. फुलांचे दर कमी झाल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळाला असला, तरी दुसरीकडे अपेक्षित दर मिळाला नाही म्हणून शेतकरी आणि फुलविक्रेत्यांमधून नाराजी व्यक्त झाली. बाजारपेठेत गर्दी झाल्याने आग्रारोड परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. लक्ष्मीपूजनाच्या तयारीसाठी शेवटच्या क्षणापर्यंत खरेदी सुरू असल्याचे चित्र शहरातील प्रमुख बाजारपेठेत पाहायला मिळाले.

दोन्ही शिवसेना एकत्र तरच दिवाळी : रघुवंशी

उधाण आले आहे. शिवसेनेत फूट पडून दोन स्वतंत्र गट निर्माण होण्याच्या घटनेबाबत बोलताना रघुवंशी यांनी खंत व्यक्त केली. शिवसेना दुभंगली, त्याच दिवशी हा दुर्दैवी प्रसंग घडायला नको होता, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. राज्यातील राजकीय समीकरणांमध्ये सातत्याने बदल होत असताना दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रीकरणाच्या चर्चांनंतर आता दोन्ही शिवसेना एकत्र येण्याच्या चर्चाही पुढे येत आहेत. अशा परिस्थितीत शिंदे गटातील आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी केलेले वक्तव्य राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे मानले जात आहे. मात्र, दोन्ही शिवसेना एकत्र येण्याबाबत कोणताही अधिकृत निर्णय किंवा घोषणा झालेली नाही. रघुवंशी यांच्या वक्तव्यामुळे राजकीय चर्चांना नवा विषय मिळाला असला, तरी प्रत्यक्षात दोन्ही गटांमध्ये एकत्रीकरणाबाबत काय भूमिका घेतली जाते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

पान १ वरुन

नुकसान झालेले मेंढपाळ कुटूंबला

चोरी झाल्यानंतर नुकसानग्रस्त धनगर वाड्यातील महिलांनी हंबरडा फोडला व आमची वीस वर्षांची कमाई पाण्यात गेली, रात्रंदिवस ऊन, वारा, पावसाची पर्वा न करता संपूर्ण कुटूंबाने वणवण भटकत मेंढ्यांच्या सांभाळ केला आणि त्याच मेंढ्या चोरट्यांनी चोरून नेल्याचे बोल रडतांना या महिलांच्या तोंडून येत होते. या घटनेची बातमी प्रसिद्ध होताच समाज माध्यमावर तीव्र संतापाची लाट उसळली, मात्र द फोक आख्यान या टीमने कोणताही गाजावाजा न करता कापडणे परिसरात जाऊन सबंधीत मेंढपाळ कुटूंबाचा शोध घेत त्यांना दोन महिने पुरेल एवढे किराणा साहित्य व रोख रक्कम मदत म्हणून दिल्याने मेंढपाळ कुटूंबाला अश्रू अनावर झाले. यावेळी हात जोडत महिलांनी मद फोक आख्यानफ टीमच्या सदस्यांचे आभार मानले.

द फोक आख्यान टीमचे सर्व पदाधिकारी शनिवारी दुपारी कापडणे परिसरात गेले. मेंढपाळ कुटूंबाचा शोध घेतला. भेदरलेल्या व मानसिक धक्क्यात असलेल्या मेंढपाळ कुटूंबाला अनेक दिवस पुरेल एवढा किराणा, मिठाई व रोख रक्कम देऊन या सर्व तरुणांनी माणुसकीची फुंकर घातली. या विधायक उपक्रम राबवणाऱ्या तरुणांचे मेंढपाळ बांधवांसह कापडणे पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी आभार मानले.

द फोक आख्यान नेमके काय आहे?

द फोक आख्यान हा महाराष्ट्राच्या समृद्ध आणि वैविध्यपूर्ण लोककलेचा एक आधुनिक व भव्य आविष्कार आहे. बारा कोसांवर बदलणारी महाराष्ट्राची भाषा, संस्कृती, परंपरा आणि सादरीकरणाचा थाट नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे काम या उपक्रमाद्वारे केले जात आहे. पारंपरिक आणि आधुनिकतेचा संगम, नव्या पिढीतील तडफदार कलाकारांनी गणापासून ते गोंधळापर्यंतच्या विविध पारंपरिक लोककलांसाठी नव्या रचना व आधुनिक सांगीतिक चाली तयार केल्या आहेत.

कलाविष्कार : खड्या आवाजातील दमदार गायन, ओघवते आख्यान, खुमासदार संवादफेक, पारंपरिक वाद्यांची जुगलबंदी आणि डोळ्यांचे पारणे फेडणारी वेशभूषा यांमुळे हा कार्यक्रम रसिकांना मंत्रमुग्ध करतो. संस्कृतीचे जतन: पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावात मराठी लोककला विस्मृतीत जाऊ नये आणि तिला पुन्हा एकदा लोकाश्रय व मानसन्मान मिळावा, या ध्येयाने ही टीम अविरत कार्यरत आहे.

सामाजिक दातृत्व : वाघ

शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे आणि दुष्काळाच्या संकटात त्याच्या चेहऱ्यावर सणाचा आनंद फुलवण्यासाठी द फोक आख्यान टीम आणि नाद स्वर चैतन्य म्युझिक अकॅडमीच्या पदाधिकाऱ्यांनी संवेदनशील सामाजिक दातृत्वाचे जे अनमोल काम केले आहे ते काम ऐन दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांचे व गोर गरीबांचे अश्रू पुसणारे आहे, अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ साहित्यिक रामदास वाघ यांनी दिली.

पासष्टाव्या महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेसाठी

महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत हे नाटक धुळे शहराचे प्रतिनिधित्व करणार आहे. धुळे शहरातील नाट्यकलेचा वारसा पुढे नेण्यासाठी कलाहर्ष संस्था सातत्याने प्रयतक होत आहेत. राज्य नाट्य स्पर्धा पूर्ण झाल्यानंतर धुळेकर नाट्यरसिकांसाठी आमचा काळ मस्त होता, या नाटकाचा विशेष प्रयोग धुळ्यात सादर केला जाणार आहे. रंगभूमी दिनाच्या निमित्ताने सुरू झालेली ही सकारात्मक वाटचाल कलाकारांना राज्य नाट्य स्पर्धेत यश मिळवून देईल, असा विश्वास दिग्दर्शक हर्षल परदेशी, राहुल मंगळे आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाला नाटकातील कलाकार कुणाल खैरनार, रोहित लोहार, अमित पागे, रेवती पागे, पौर्णिमा वाघ, धनंजय दीक्षित, शशिकांत नागरे, कल्पेश नेरकर, ज्ञानदा फरताडे, निनाद पोतदार, दुर्गा जीवरक आणि बालकलाकार लौकिक मोरे यांच्यासह धुळे शहरातील अनेक नाट्यप्रेमी उपस्थित होते. खजिनदार लोकेश चौधरी यांनी सर्व कलाकारांना शुभेच्छा दिल्या.

सोफा, डायनींग टेबल, सोफा- कमबेड, पलंग, दिवान, टिपाई, कपाट, ड्रेसींग टेबल, आराम चेअर, ऑफीस टेबल ऑफीस चेअर तसेच वास्तु-शास्त्रा योग्य शेवन लाकडाचे मंदिर तसेच मार्बलचे मंदिर आणि तुळशी वृंदावन..



शिवम कॉर्पोरेशन
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे
फो. 9595397718, 9665886722

विकणे आहे
वलवाडी गोंदुर रोड दुकान फर्निचर पीओपीसह विकणे आहे. व भोकर शिवारात विमानतळ फाटा सर्व्हे नं.९/१/२ मधील प्लॉट विकणे आहे.
9011894666

पाहिजेत
सोफा कारागीर दुकानात माल जोडणे, सिलाई काम करणारे लेडीज / जेन्टस पाहिजेत. भरपूर पगार.
-: संपर्क :-
फो नं.9423941247

प्लॉट विकणे
धुळ्याच्या पॉश वसाहतीत स्नेहनगर मध्ये सुमारे ३००० फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
डी.आर.प्रॉपर्टीज
9422289693

रोडटच प्लॉट विकणे
कॉटन मार्केटच्या पुढे, रामचंद्र नगर मध्ये ६० फुटी काँक्रीट रोडला लागून ४३०० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
डी.आर.प्रॉपर्टीज
9422289693

फ्लॅट भाड्याने देणे
गव्हर्मेंट किंवा कंपनी ऑफिसर फॅमिली करिता २ बीएचके फ्लॅट सर्व सोयीयुक्त दत्त मंदिर सत्संग कॉलनी येथे भाड्याने देणे आहे
संपर्क- प्रशांत वाणी
7620009038
9422239358

प्लॉट विकणे
दूध डेअरी रोड जवळ केदार सिटी आणि विमलनाथ नगर मध्ये लहान प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
डी.आर.प्रॉपर्टीज
9422289693

प्लॉट विकणे
MIDC स्टेट बँकेच्या रोडवर ६५०० चौरस फुटाच्या कमर्शियल प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
डी.आर.प्रॉपर्टीज
9422289693

प्लॉट विकणे
स्टेशन रोडवर दोन रोड कॉर्नर प्लॉट हॉस्पिटल, डॉक्टर्स, शॉपिंग कॉम्प्लेक्ससाठी उपयुक्त विकणे आहे.
-: संपर्क :-
डी.आर.प्रॉपर्टीज
9422289693

शिरपूर येथे बालाजी सेवा समितीच्या वुमेन्स एक्स्पो- २०२६ ला प्रतिसाद

शिरपूर, दि. ८- महिलांच्या अंगी असलेल्या कलागुणांना, व्यावसायिक कौशल्याला आणि उद्योजकीय क्षमतेला प्रोत्साहन देत त्यांना स्वतःच्या व्यवसायाची ओळख निर्माण करून देण्यासाठी बालाजी सेवा समिती लेडीज विंगतर्फे आयोजित करण्यात आलेल्या वुमेन्स एक्स्पो २०२६ या भव्य प्रदर्शनाला यंदा दुप्पट प्रतिसाद मिळाला. शिरपूर शहरातील जवळपासमोठ्या प्रमाणावर महिला उद्योजिकांनी विविध वस्तूंचे आकर्षक स्टॉल्स लावून आपल्या उत्पादनांचे प्रदर्शन केले. नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, खरेदीदारांची गर्दी आणि महिला उद्योजिकांचा उत्साह यामुळे प्रदर्शनाला विशेष रंगत आली.

महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रोत्साहन देणे, त्यांच्या छोट्या-मोठ्या व्यवसायांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे तसेच त्यांच्या उत्पादनांची जाहिरात आणि विक्री करण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ निर्माण करणे, हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमामुळे शिरपूरमधील अनेक महिला उद्योजिकांना आपल्या व्यवसायाची ओळख अधिक व्यापक स्वरूपात ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याची संधी मिळाली. विशेष म्हणजे, यंदा गतवर्षीच्या तुलनेत प्रदर्शनाला भगिनींचा मोठ्या संख्येने प्रतिसाद मिळाल्याने महिला उद्योजिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेलांचे मार्गदर्शन

माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन अमरिशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपनगराध्यक्षा संगीताताई राजेंद्र देवरे आणि श्री विलेपार्ले केळवाणी मंडळ शिरपूर कॅम्पस प्रभारी रीताबेन पटेल यांच्या सहकार्याने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. कोअर कमिटीच्या दिव्या दीप जैन, मीनाक्षी अंकुश राठी, चारू सुनील पाटील, डिंपल मिलिंद गुजराती आणि तसलीम जळगाववाला यांनी नियोजनबद्ध पद्धतीने प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

महिला सक्षमीकरणाच्या दिशेने प्रेरणादायी पाऊल

आजच्या काळात महिला शिक्षण, नोकरी, उद्योग आणि व्यवसाय अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. मात्र अनेक महिलांकडे उत्तम कौशल्य आणि दर्जेदार उत्पादने असूनही त्यांना योग्य बाजारपेठ आणि ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळत नाही. अशा महिलांसाठी वुमेन्स एक्स्पो सारखे उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरत आहेत.

बालाजी सेवा समिती लेडीज विंगचा हा उपक्रम केवळ प्रदर्शनापुरता मर्यादित न राहता महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणारा आणि स्थानिक महिला उद्योजिकांना प्रोत्साहन देणारा महत्त्वपूर्ण प्रयत्न ठरत आहे. महिलांच्या कलागुणांना वाव देत त्यांच्या व्यवसायाला नवी दिशा देणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

पांझरा किनारच्या रवीदास उद्यानामधील आर्थिक लुट थांबविण्याचे मनसचे निवेदन

धुळे, दि.८ (प्रतिनिधी) : शहरातील संत रवीदास महाराज उद्यानात ठेकेदाराकडून नागरिकांची अवाजवी शुल्क आकारणी करून आर्थिक लुट केली जात असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या विद्यार्थी आघाडीने केला आहे. यासंदर्भात मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देत संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. दोन दिवसात नागरिकांची लुट थांबली पाहिजे, नाही तर मनसेच्या खास शैलीत आंदोलन केले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

धुळे शहरात वीर सावरकर मार्गावरील पांझरा नदी चौपाटीजवळ असलेल्या संत रवीदास उद्यानात प्रवेशासाठी अधिकृत दरापेक्षा जास्त शुल्क आकारले जात असल्याचा आरोप निवेदनात आहे. नागरिकांकडून प्रति व्यक्ती दहा ते वीस रुपये वसूल केले जात आहेत. दिल्या जाणाऱ्या पावत्यांवर केवळ एन्ट्री फी, असा उल्लेख असतो. त्यामुळे शुल्काचा नेमका तपशील स्पष्ट होत नाही. याशिवाय, महानगरपालिकेच्या निधीतून उभारण्यात आलेला लहान मुलांचा सार्वजनिक प्लेईंग एरिया जाळ्या लावून बंद करण्यात आला आहे. या ठिकाणी खेळण्यासाठी लहान मुलांकडून वीस रुपये, तर त्यांच्यासोबत जाणाऱ्या पालकांकडूनही प्रत्येकी वीस रुपये आकारले जात आहे. त्यामुळे सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. आर्थिक परिस्थितीमुळे मुलांना खेळण्यापासून वंचित राहावे लागत असल्याचे मनसेने म्हटले आहे.

उद्यानात विविध सुविधांचे अधिकृत दर दर्शविणारे स्पष्ट सूचना फलक नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे. शुल्काबाबत विचारणा करणाऱ्या नागरिकांना काही व्यक्तींकडून धमकावले जाते. उद्यानातील महिला, बालके आणि नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्नही आहे. या प्रकरणी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी उद्यानाची प्रत्यक्ष पाहणी करावी. शुल्क आकारणीची चौकशी करावी. सार्वजनिक प्लेईंग एरिया सर्व मुलांसाठी खुला करावा. अधिकृत दरांचे फलक लावावेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करावी, अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. येत्या दोन दिवसांत योग्य ती कायदेशीर कारवाई झाली नाही तर उद्यानाच्या प्रवेशद्वारावर तसेच महानगरपालिकेत तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी मनसे विद्यार्थी सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष शामक दादाभाई, प्रदेश सचिव प्राची कुलकर्णी, अनिल शिरसाठ, शाम देवकाते, विठोबा मराठे, उज्वला दादाभाई, विजया गुरुबा, निलेश गुरव उपस्थित होते.

निधन वार्ता

प्रा. रजनी पाटील



धुळे, दि. ८ : येथील एस.एस.व्ही.पी.एस. महाविद्यालयातील मराठी विषयाच्या प्राध्यापिका रजनी बाबुराव पाटील यांचे रविवारी सकाळी सातच्या सुमारास निधन झाले. एकवीरा देवी मंदिर शेजारी स्मशान भूमीत त्यांच्यावर दुपारी चारच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या जाण्याने कुटुंबीय, नातेवाईक आणि परिचितांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पुत्र डॉ. तुषार पाटील, डॉ. प्रियंका पाटील, डॉ. चेतन पाटील, डॉ. दिपाली पाटील, डॉ. अविष्कार पाटील, डॉ. गीतांजली पाटील, नातवंडे, असा परिवार आहे.

पान १ वरुन

नवापूर पाणी योजना ९३.१३ को.ची

कार्यकारी अभियंत्यांच्या पत्रातून स्पष्ट होते. त्यामुळे योजनेची वस्तुस्थिती समजून न घेता विरोध करणे योग्य नसल्याचे त्यांनी सांगितले.

सहा महिन्यांत योजनेला मंजुरी

नवापूर नगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस-शिवसेना युतीला शहरातील नागरिकांनी बहुमत दिले. नागरिकांनी दाखविलेल्या विश्वासाची परतफेड करणे ही आमची जबाबदारी आहे. निवडणुकीच्या वेळी दिलेला शब्द पूर्ण करण्याच्या दृष्टीने अवघ्या ६ महिन्यांत ९३.१३ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेला मंजुरी मिळवून देण्यात आली, असे आमदार रघुवंशी यांनी सांगितले. विरोधकांनी स्वप्नातही इतक्या कमी कालावधीत या योजनेला मंजुरी मिळेल, अशी कल्पना केली नसेल, अशी टिपण्णीही आ. रघुवंशी यांनी केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या योजनेला मंजुरी दिल्याने नवापूर शहराच्या पाणी पुरवठ्याचा प्रश्न सोडविण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडल्याचे आमदार रघुवंशी यांनी नमूद केले.

प्रदूषणमुक्त दिवाळीसाठी विद्यार्थ्यांनी घेतली शपथ

फटाक्यांची आतषबाजी केली जाते. त्यामुळे ध्वनी आणि वायू प्रदूषण होते. त्याचा परिणाम सजीव प्राण्यांसह वनस्पतींवर देखील होतो. त्यामुळे फटाकेमुक्त दिवाळी साजरी करावी, असे आवाहन अंधश्रध्दा निर्मूलन समितीने केले. धुळे तालुक्यातील निमगुळ येथे न्यु इंग्लीश स्कूल आणि जिल्हा परिषदेच्या शाळेत झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना दुष्परिणामांची माहिती देण्यात आली. जिल्हा पदाधिकारी दिलीप खिवसरा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पुर्वी फटाके केवळ दिवाळीत फोडले जात होते. मात्र, अलिकडे साखरपुडा, लग्नसमारंभ, वाढदिवस, वर्ष अखेर, निवडणुका, राजकीय दौरे, स्वागत समारंभ, वर्धापन दिन, रावण दहन तसेच क्रिकेटचा सामना जिंकल्यानंतरही मोठ्या प्रमाणात फटाके फोडले जातात. फटाक्यांमुळे निर्माण होणारी समस्या केवळ दिवाळीच्या काळा पुरता मर्यादीत राहिली नाही. तेव्हा याबाबत गांभीर्याने विचार व्हावा. प्रदुषण रोखण्यासाठी फटाकेमुक्त दिवाळी आणि कार्यक्रम ही भूमिका घेतील पाहिजे, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी यावेळी फटाकेमुक्त दिवाळीची शपथ घेतली. फटाक्यांवर खर्च होणाऱ्या पैशांतून चांगली पुस्तके, खेळणी खरेदी करणार, श्नयतोवर गरजू व्यक्तींना मदत करणार, असा संकल्प यावेळी विद्यार्थ्यांनी केला. कार्यक्रमात मुख्याध्यापक एस. एम. भावसार, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक उमेश सांगळे, श्रीमती पी. पी. अहिराव, किशोर पिसे, श्रीमती सीमा दराडे, सी. एन. नगराळे, एस. व्ही. भदाणे, ए. एन. साळुंखे, एम. एस. अहिरे, एम. एफ. देसले, श्रीमती जी. डी. पाटील, सी. ए. पवार, पी. बी. साळी यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

तृतीयपंथीयांचा धुळ्यात दुग्ध व्यवसाय

अशा सर्व जबाबदाऱ्या संस्थेचे सहा तृतीयपंथीय सदस्य आत्मविश्वासाने सांभाळत आहेत. या उपक्रमामुळे त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी मिळाली असून नियमित रोजगाराचे साधन उपलब्ध झाले आहे.

दररोज ८०-९० लिटर दूध विक्री

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी या दुग्धव्यवसाय प्रकल्पाला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी म्हशींचे संगोपन, चारा व्यवस्थापन आणि दूध उत्पादनाची माहिती जाणून घेतली. मेहनत आणि जिद्दीने हा व्यवसाय यशस्वीपणे सांभाळणाऱ्या तृतीयपंथीयांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले. सध्या या प्रकल्पातून दररोज सुमारे ८० ते ९० लिटर दुधाची विक्री होत आहे. त्यामुळे संस्थेतील सहा तृतीयपंथीयांना रोजगार आणि आर्थिक स्वावलंबनाचा आधार मिळाला आहे.

दुष्काळात सामाजिक बांधिलकी

विशेष म्हणजे, जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली असतानाही या संस्थेने सामाजिक बांधिलकी जपत गरजूंच्या मदतीसाठी पुढाकार घेतला. संस्थेच्या वतीने परित्यक्ता आणि विधवा महिलांना शिधावाटप करण्यात आले. दुष्काळ निवारणासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे २१ हजार रुपयांची देणगी सुपूर्द करण्यात आली. स्वतः आर्थिक आणि सामाजिक संघर्षातून मार्ग काढणाऱ्या तृतीयपंथीयांनी संकटकाळात इतरांना मदतीचा हात दिल्याने त्यांच्या कार्याचे विशेष कौतुक होत आहे.

सहानुभूती नको, समान संधी द्या

समाजातील उपेक्षित घटकांना केवळ सहानुभूती देण्यापेक्षा त्यांना समान संधी द्यावी. रोजगाराची साधने आणि आत्मनिर्भर होण्यासाठी आवश्यक संसाधने उपलब्ध करून दिल्यास ते स्वतःच्या कर्तृत्वावर यशस्वी होऊ शकतात, हे धुळ्यातील प्रेरणा संस्थेच्या उपक्रमातून अधोरेखित झाले आहे. स्वतःच्या मेहनतीतून आर्थिक स्वावलंबन मिळवतानाच समाजातील गरजूंच्या मदतीसाठी पुढे सरसावलेल्या तृतीयपंथीयांचा माणुसकीचा अनोखा आदर्श निर्माण केला आहे.

Godrej
27 वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर.



आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट
BAJAJ FINSERV
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
फायनान्सला लागणारी कागदपत्रे
1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
नियम व अटी लागू*
ak media- 238222
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोनः 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०